MAHMAR/19358/13/1/2000-TC

विद्या प्रासारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तेरावे / अंक ११ / नोव्हेंबर २०१२

## संपादकीय

### शिक्षा - गुंतागुंतीचा विषय

शाळांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी ''प्रोहिबिशन ऑफ अनफेअर प्रॅक्टीसेस इन स्कूल्स - २०१२'' हा कायदा लवकरच होऊ घातला आहे. या कायद्याला 'अनफेअर मीन्स' च्या ज्या अनेक तरतुदी आहेत त्यांपैकीच एक म्हणजे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षा केली तर त्या शिक्षकांना शिक्षा होईल ही तरतूद.

मुळात शिक्षा हा शब्दच असा आहे की त्याची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. 'शिक्षण शास्त्र आणि सामाजिक शास्त्र संज्ञा कोशात' समाजविघातक वर्तनाचे प्रमाण कमी व्हावे म्हणून कृती अगर वर्तन करणाऱ्याला गंभीर परिणाम भोगायला लावणे, म्हणजे शिक्षा अशी व्याख्या देण्यात आली आहे. वास्तविक शाळांतील विद्यार्थ्यांकडून 'समाजविघातक वर्तन' घडणे म्हणजे नेमके काय याचा विचार करावयास हवा. 'छडी लागे छम छम विद्या येई घम घम' या मागे पडलेल्या काळापासून ते आजवर विद्यार्थ्यांनी चांगले अध्ययन करावे, त्यांना योग्य वळण लागावे, स्पर्धेच्या जगात मागे राहू नये, मोठ्यांचा त्यांनी आदर करावा या व अशा बाबतीत त्यांनी सहकार्य केले नाही तर त्यांना शिक्षा केली जावी हे समाजमान्य आहे. पण ही शिक्षा शारीरिक पातळीवर येते तेव्हा अनेक प्रश्न सुरू होतात.

एखाद्या शिक्षकाने कार्पोरेल पनिशमेंट, शारिरीक शिक्षा दिल्यास त्याला एक ते तीन वर्षाच्या कारावासाची कडक तरतूद या विधेयकात आहे. येथे शारीरिक शिक्षा म्हणजे कोणती ते स्पष्ट नाही. फूटपट्टीने मारण्यापासून ते गंभीर इजा करण्यापर्यंत सर्वच 'शारीरिक शिक्षा' होतात.

शिक्षक मानसिक दृष्ट्या त्रस्त असू शकतो वा त्यात नकारात्मक प्रवृत्तीही असू शकतात. काही महिन्यांपूर्वी कलकत्त्यात एका विद्यार्थिनीला एका शिक्षिकेने घृणास्पद शिक्षा दिली व या विषयाची चर्चा पुन्हा सुरू झाली.

यात एक धोका असाही संभवू शकतो की शिक्षकाची छळवणूक करण्यासाठी शालेय व्यवस्थापन वा पालक याचा गैरवापर करू शकतात. हे सर्व टाळायचे असेल तर संवाद आणि सामंजस्य यावरच अधिक भर असायला हवा. शिक्षण ही आनंददायी प्रक्रिया ठरावयाची असेल तर शाळांना तुरुंगाचे स्वरूप आणणारे असे विषय अधिक परिपक्वतेने हाताळावयास

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

हवेत. अपवादांवरून नियम बनवण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा अपवाद कमी कसे होतील हे पाहणे यात माणुसकी आहे. शिक्षा करणाऱ्या शिक्षकांना शिक्षा करण्याच्या या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर एका लवादाची नेमणूक केली जाणार आहे असे समजते. कायदे, लवाद, लवादांच्या कार्यकक्षा हे सर्व दिसायला चांगलेच असते; पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. मुलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रकरणांसाठी बालहक्क आयोग आहेत; परंतु आयोगाने दिलेल्या आदेशांना हरताळ फासण्याचीच प्रवृत्ती आहे.

अर्थात याचा अर्थ सर्व शिक्षक चांगले, निर्दोष व विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करणारे असतात असे नाही. शिक्षकपेशा हा पोट भरण्यासाठी नाइलाजाने स्वीकारलेले एक काम, अशा दृष्टीनेच या नोकरीकडे पाहणारे प्राध्यापक, शिक्षक अधिक असतात. अनेक दडपणांना तोंड देत, कंटाळत कंटाळत दिवस भरणारे असे शिक्षक आपल्या मनातील सुप्त असे अनेक प्रकारचे राग मुलांवर काढतात व त्यातूनही असे प्रश्न निर्माण होतात.

मेंदू शास्त्रातील संशोधनांवरून असे दिसते की शिक्षा केल्याने बौद्धिक काम थांबते. किंबहुना त्यातून अनेक गुंतागुंतीचे भावनिक प्रश्न निर्माण होऊन आत्महत्येपर्यंत मजल जाते. शिक्षा विचारपूर्वक केली जात नाही, ती तत्कालिक प्रतिक्रिया असते. त्यामुळे मुलांच्या मनावर होणारे परिणाम हा एक गंभीर पैलू या विषयाला आहे, की ज्याचा विचार केला जात नाही.

शिक्षेमुळे बुद्धी वाढत नाही, भय मात्र वाढते असे म्हणतात. पण त्याचबरोबर सूडाची भावनाही मनात रुजते. बदला घेण्याकडे मनाचा कल होतो. हे सर्व इतके नकळत होते की त्या विद्यार्थ्यालाही समजत नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात गिजूभाई बधेका एका ठिकाणी म्हणाले आहेत, ''भयाने मुले लिहिती वाचती होतीलही कदाचित. पण शेवटी सगळे विसरून जातील. मुलांना मारण्याचा प्रसंग बहुधा शिक्षकांच्या मनाचा असमतोलपणा आणि त्याच्या मुळाशी मुलास शिकविता येण्यासाठी आवश्यक त्या लायकीचा अभाव यांमुळे उद्‌भवतो.'' यातील मुलास शिकविता येण्याची लायकीयाचा गर्भितार्थ फार महत्त्वाचा आहे. हा अभाव घालवायचा असेल तर शिक्षण बाहेरून लादायचे नाही, आतून उमलवायचे आहे हे शिक्षकास कळायला हवे आणि त्यासाठी सकारात्मक विचारांचे संस्कार मुलांच्या लहानपणापासून केले जायला हवेत.

**- मोहन पाठक**

(गेल्या अंकापासून संपादकीय हे संवाद स्वरूपात मांडत आहोत. मी लिहिलेल्या संपादकीयावर माननीय डॉ. विजय बेडेकर यांनी व्यक्त केलेले विचार येथे देत आहोत. - मोहन पाठक)

शाळा, शिक्षक, शैक्षणिक सोयीसुविधा आणि अर्थातच पालकांचा त्यांमधला सहभाग यात आमूलाग्र बदल घडवणाऱ्या जाणिवा पाश्चिमात्त्य देशांत, विशेषतः अमेरिकेत ६०-७० वर्षांपासून जोर धरू लागल्या. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा त्यामध्ये प्रामुख्याने विचार होता. यांत्रिकी सोयीसुविधा, शिक्षण संवादाची माध्यमे यांमधील बदलांबरोबरच मूलभूत शिक्षण म्हणजे काय आणि त्यातील शिक्षक व पालकांचा सहभाग यांचाही गांभीर्याने विचार होऊ लागला. या बदलाला असलेली सांस्कृतिक आणि भौतिक पार्श्वभूमी याकरता तपासणे फार महत्त्वाचे आहे. पाश्चिमात्त्य राष्ट्रे, विशेषतः अमेरिका महायुद्धानंतर औद्योगिकीकरण व आर्थिक सुबत्तेच्या शिखरावर आरूढ व्हायला लागली होती. सोयी सवलतींच्या भौतिक सुकाळाबरोबर मानवी नात्यांमध्ये ओलाव्याचा दुष्काळ चालू झाला होता.

(पृष्ठ क्र. ३ वर)

वर्ष तेरावे/अंक ११/नोव्हेंबर २०१२

वर्ष तेरावे/अंक ११/नोव्हेंबर २०१२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक ४ था)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | केंब्रिजच्या फिट्झविल्यम संग्रहालयाला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | पंचीकरणम् | श्री. अविनाश पाठक | ९ |
| ४) | पुस्तक परिचय | श्रीमती आशा भिडे | |
| | १) कट्टा | | १२ |
| | २) नांगरल्याविण भुई (कादंबरी) | | १४ |
| ५) | बृहदारण्यक उपनिषद | श्री. शं. बा. मठ | १७ |
| ६) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २४ |
| ७) | श्री रामचरित मानस | प्राचार्य सी. श्री. मुजुमदार | २९ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर<br>कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२<br>या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

- संपादक

# केंब्रिजच्या फिट्झविल्यम संग्रहालयाला भेट

*केंब्रिजच्या फिट्झविल्यम संग्रहालयातील वस्तूसंग्रहाची माहिती या लेखात दिली आहे. अतिशय प्रशस्त दालने व वस्तूसंग्रहातील वैविध्य अवाक करणारे आहे.*

प्राच्यविद्या अभ्यास संस्था यांच्या वतीने भारतीय विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी उन्हाळ्यात एक शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या सहलीत इंग्लंडमधील ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन या तीन महत्त्वाच्या शहरांना भेटी आयोजित केल्या जातात. सुरुवात ऑक्सफर्ड पासून होते. ऑक्सफर्ड शहरात तीन दिवस घालविल्यानंतर विद्यार्थ्यांचा चमू केंब्रिजला येतो. प्रथम केंब्रिज टूर बसच्या टपावर बसून आणि पायी फिरून शहराची ओळख करून घेतली जाते. त्यानंतर शहरातील निवडक पण महत्त्वाच्या ठिकाणांना भेटी दिल्या जातात. त्यातील फिट्झविल्यम संग्रहालय हे एक ठिकाण आहे. केंब्रिजच्या ट्रंपिंगटन मार्गावर वसलेले हे संग्रहालय आमच्या राहण्याच्या ठिकाणापासून जवळच होते. साधारणपणे १०-१५ मिनिटे चालत गेलो की आपण या संग्रहालयाजवळ पोहोचतो.



संग्रहालयाची भव्य वास्तू

आदल्या दिवशी केंब्रिज टूरच्या बसने प्रवास करताना आम्ही हे ठिकाण पाहून ठेवले होते. अगदी थोड्या वेळात संग्रहालयातून चक्करही मारून आलो. तेव्हा संग्रहालयाचा आवाका मोठा असल्याचे आमच्या लक्षात आले. दुसऱ्या दिवशी परत यायचे असे ठरवूनच आम्ही पुन्हा बस पकडण्यासाठी संग्रहालयाच्या बाहेर पडलो. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही तिथे पोहोचलो. त्यावेळेस संग्रहालय उघडलेदेखील नव्हते. म्हणून आम्ही बाहेरून इमारतीचे निरीक्षण करू लागलो. गोथिक शिल्पकलेत बांधलेली ही दगडाची इमारत असून बरीच लांबलचक आहे. इमारतीच्या उजव्या बाजूला मोठे प्रवेशद्वार असून तेथे पोहोचण्यासाठी बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. इमारतीच्या डाव्या बाजूला एक लहानसे प्रवेशद्वार असून ते तळमजल्यावरच आहे. बरेचजण या दाराने प्रवेश करतात. त्या दाराजवळ काही लोक आधीपासूनच उभे होते. दार उघडताच त्यांच्याबरोबर आम्हीदेखील आत शिरलो. आम्ही काचेच्या दारातून आत प्रवेश करताच स्वागत कक्षातील मंडळींनी आमचे स्वागत केले. संग्रहालयाची आखणी कशी आहे याची त्यांनी आम्हांला थोडक्यात माहिती दिली आणि आमच्या हातात एक छापील कागद दिला. इंग्लंडमध्ये कधीही पाऊस येतो. म्हणून छत्री सतत बाळगावी लागते. पर्यटकांनी आपल्याबरोबर आणलेल्या छत्र्या ठेवण्यासाठी तेथे व्यवस्था होती. छत्र्या ठेवून आम्ही संग्रहालयात शिरू लागलो तर आमच्या बॅगा लॉकरमध्ये ठेवण्याची सूचना तिथल्या मंडळींनी केली. संग्रहालयात पिशवी, बॅग एवढेच नव्हे तर कॅमेरादेखील नेण्याची परवानगी नाही. या सगळ्या वस्तू आम्हांला तेथेच ठेवाव्या लागल्या. नवीन ठिकाण पाहायला जातो आणि सोबत कॅमेरा नाही या गोष्टीचे आम्हाला वैषम्य वाटत होते. परंतु इलाज

क्रोध माणसाला आतून बाहेरुन जाळतो, घराणीच्या घराणी उद्‌ध्वस्त करतो.

नव्हता.त्या संग्रहालयाचा नियमच तसा आहे. अगदी फोटोसुद्धा काढू नये एवढे काय महत्त्वाचे तेथे आहे? असा प्रश्न आम्हांला पडला. या प्रश्नाचे उत्तर आम्हांला संग्रहालयात प्रवेश करताच मिळाले.



प्रवेशद्वाराजवळ घेतलेले छायाचित्र

संग्रहालय दोन मजल्यांवर पसरलेले आहे; तळमजला आणि पहिला मजला. प्रत्येक खोलीला क्रमांक दिलेला आहे. पहिल्या क्रमांकाची खोली आहे मुख्य प्रवेशद्वाराजवळ पहिल्या मजल्यावर. १ ते १७ क्रमांकाच्या खोल्या पहिल्या मजल्यावर आहेत. १८ व्या क्रमांकाची खोली मॅझेनाईन (तळमजला व पहिला मजला यांमधील जागा) वर आहे. क्रमांक १९ ते ३४ या क्रमांकाच्या खोल्या तळमजल्यावर आहेत. जमिनीखालीदेखील एक मजला आहे. तेथे तीन खोल्या आहेत. परंतु या खोल्यांमध्ये प्रदर्शनीय वस्तू नाहीत. त्यातील एक खोली व्याख्यान कक्ष (Seminar room) म्हणून वापरली जाते. दुसरी खोली स्टुडिओसाठी वापरली जाते तर तिसरी खोली शालेय विद्यार्थ्यांना सामान ठेवण्यासाठी आणि डबे खाण्यासाठी वापरली जाते. शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या संग्रहालयात यावे असा त्यांचा प्रयत्न असतो. एखाद्या शाळेने त्यांना आगाऊ सूचना दिली तर ते संपूर्ण प्रदर्शन दाखविण्याची आणि व्याख्यानाची व्यवस्था करतात.

आम्ही प्रवेश केला होता तळमजल्यावरून आणि तेही लहान प्रवेशद्वारातून. त्यामुळे आम्ही आत जाताच उजव्या बाजूला आम्हांला दिसल्या खोल्या क्रमांक ३१,३२,३३,३४. यापैकी ३१ क्रमांकाची खोली खूप मोठी असून त्यात अनेक प्रकारची शस्त्रास्त्रे ठेवलेली होती. बंदुका, भाले, खंजीर याचबरोबर युद्धाच्या वेळेस संरक्षणासाठी घालावयाचे कवच तिथे ठेवलेले होते. संपूर्ण तयारीनिशी उभा असलेला शिपाई आपले लक्ष वेधून घेतो. खोलीत सगळीकडे शस्त्रेच शस्त्रे दिसतात. हे पाहून आपण पुढे जातो, तेव्हा आपल्याला तीन लहानलहान खोल्या दिसतात. या खोल्यांत उजेडदेखील कमी होता. काय आहे म्हणून आम्ही ३२ क्रमांकाच्या खोलीत डोकावलो. तर तेथे पेंटिंग्ज लावलेली असून प्रत्येक पेंटींगवर प्रकाश टाकलेला आहे. या विभागाला रास्चाइल्ड (Rathschild) गॅलरी म्हणतात. त्यात मध्यकाळातील आणि युरोपच्या उत्खनन काळातील पेंटिंग्ज ठेवलेली आहेत. त्याच्याच बाजूच्या खोलीत म्हणजे खोली क्रमांक ३३ मध्ये पूर्वेकडील देशांतील कलाकुसरीच्या वस्तू ठेवलेल्या आहेत. या सगळ्यांमध्ये आपले लक्ष वेधून घेतो ते खोली क्रमांक ३४ मधला संग्रह. यात वेगवेगळ्या प्रकारचे पंखे ठेवलेले आहेत. हातपंख्याच्या बाबतीत जपान्यांचा हात धरणे ही अशक्य कोटीतील बाब आहे. कागद, कापड, धातू अशा अनेक पदार्थांपासून बनविलेले वेगवेगळ्या आकाराचे आणि वेगवेगळ्या रंगांचे पंखे आपल्याला जपानमध्ये पाहायला मिळतात. अशा सगळ्या पंख्यांचा संग्रह येथे करून ठेवलेला आहे. या दालनाच्या निर्मितीत जपानी माणसानेच पुढाकार घेतला होता. म्हणून त्याचेच नाव या दालनाला दिलेले आहे. दालनाचे नाव सासाकावा फॅन गॅलरी (Sasakawa Fan Gallery) असे आहे.

---

आपण दुसऱ्यांना त्रास दिला म्हणजे आपण अशांत होतो.



एक सुंदर चित्र

हातपंख्यांचे प्रदर्शन पाहून आम्ही २७ क्रमांकाच्या दालनात आलो. हे खूपच मोठे असून लांबट आकाराचे आहे. या संपूर्ण दालनात युरोपातील मातीची भांडी (European Pottery) ठेवलेली आहेत. चिनी मातीची वेगवेगळ्या आकाराची भांडी आणि त्यावर केलेली रंगीबेरंगी कलाकुसर आपले लक्ष वेधून घेते. बाहेरचा भरपूर प्रकाश आत येईल अशा पद्धतीने मोठमोठ्या खिडक्या या खोलीला ठेवलेल्या आहेत. या खिडक्यांना लावलेली काचेची तावदाने रोज स्वच्छ केली तातात. त्यांतून खोलीत आलेला सूर्यप्रकाश सर्व भांडी उजळून टाकतो. त्यामुळे अनेक भांडी चकाकताना दिसतात. या दालनात दोन्ही बाजूला लावलेली भांडी बघत बघत आम्ही २८ क्रमांकाच्या खोलीत प्रवेश केला. या खोलीत पूर्वेकडील दूरच्या देशात आढळणाऱ्या वस्तू ठेवलेल्या आहेत. त्यात समावेश होतो, थायलंड, मलेशिया, व्हिएतनाम, कंबोडीया इत्यादी देशांचा. कोरिया देशातील वस्तूंचा संग्रह जास्त असल्याने त्याच्यासाठी वेगळी खोली देण्यात आली आहे. खोली क्रमांक २९ पूर्णपणे कोरियातील वस्तूंसाठी आहे. यात सगळ्या प्रकारच्या वस्तूंचा समावेश आहे. बांबू, कापड, कनाद, धातू यापासून किती कलाकुसरीच्या वस्तू या देशात बनविल्या जातात याची आपल्याला चांगली कल्पना येते.

२९ क्रमांकाच्या खोलीला लागून एक मोठे पटांगण आहे. या पटांगणात छोटेसे उपहारगृह आणि संग्रहालयाचे दुकान आहे. त्याच्या पलीकडे एका मोठ्या दालनात (क्र.३०) वाचनालय आहे. वाचनालयात जाऊन आम्ही नजर टाकून आलो. वस्तूंची खरेदी करायची होतीच. त्याचबरोबर उपहारगृहात चहादेखील घ्यायचा होता. पण ते शेवटी करू म्हणून आम्ही प्रदर्शन पाहण्यास गर्क झालो. त्यासाठी आम्हांला परत २७ क्रमांकाच्या दालनात यावे लागले. या दालनातून उजवीकडे एक रस्ता जातो. हा रस्ता खरा जुन्या आणि नवीन इमारतीला जोडणारा रस्ता आहे. आम्ही संग्रहालयाच्या नवीन इमारतीत होतो. पलिकडे संग्रहालयाची जुनी इमारत होती. भव्य प्रवेदशद्वार आणि तिथे जाण्याच्या ज्या पायऱ्या आम्ही बाहेरून पाहिल्या होत्या, त्या जुन्या इमारतीत होत्या. तळमजल्यावरील खोली क्रमांक १९ ते २४ जुन्या इमारतीत होत्या. तेथे जाण्यासाठी २६ क्रमांकाच्या दालनातून जावे लागते. खरे तर हे दालन म्हणजे दोन इमारतींना जोडणारी वाट आहे. परंतु त्याचादेखील मोठ्या शिताफीने उपयोग करून घेतलेला आहे. या वाटेत दोन्ही बाजूला युरोपियन आणि जपानी, चीनी मातीच्या वस्तू (Euroupean and Japanese porcelain) ठेवलेल्या आहेत. त्यांचे विविध आकार, उत्तम कलाकुसर, विविध रंगछटा आपल्याला खिळवून ठेवतात. या मध्ये समावेश आहे भांडी, पुतळे, दैनंदिन वापराच्या वस्तू, शोभेच्या वस्तू इत्यादी वस्तूंचा. हा कॉरिडॉर (Corridor) बराच मोठा आहे. परंतु त्यातील इंच न इंच

जागा वापरलेली आहे. काही वस्तू काचेच्या कपाटात ठेवलेल्या आहेत तर काही वस्तू उघड्यावर ठेवलेल्या आहेत.



चिनी मातीची भांडी

आपण जुन्या इमारतीत प्रवेश करतो ते २२ क्रमांकाच्या खोलीत. या खोलीला नाव दिलेले आहे ए.जी. लेव्हेंटिस गॅलरी (A.G. Leventis Gallery) आणि यात संग्रह आहे सायप्रस देशातून आणलेल्या वस्तूंचा. सायप्रस हे भूमध्य सागरातील एक लहानसे बेट असून कलेच्या क्षेत्रात प्राचीन काळात हे नावाजलेले ठिकाण होते. दर्यावर्दी, ग्रीक, रोमन आणि नंतर इंग्रज या बेटावर आले. त्यांच्या संस्कृतीचा सायप्रसच्या लोकांवर प्रभाव पडला. तांबे या धातूची निर्मिती प्रथम या बेटावर करण्यात आली असे म्हणतात. त्यावरूनच तांब्याला क्यूप्रम असे नाव लॅटिन भाषेत पडले असे सांगितले जाते. सायप्रसमधील वस्तूंच्या या दालनात दगडी पुतळे आहेत. तांब्याच्या वस्तू आहेत. त्याचबरोबर इतर धातूंच्या वस्तूदेखील आहेत. प्रत्येक वस्तूजवळ तिच्याबद्दल थोडक्यात माहितीदेखील लिहिलेली होती. परंतु आमच्याकडे वेळ मर्यादित असल्याने सगळा मजकूर वाचता आला नाही. लगबगीने आम्ही या खोलीच्या बाहेर पडलो आणि दालन क्रमांक २९ मध्ये प्रवेश केला.

२९ क्रमांकाचे दालन फारच मोठे आहे. या दालनात ग्रीक आणि रोमन या दोन प्रसिद्ध राजवटीतील वस्तू ठेवलेल्या आहेत. आपण जर प्राचीन इतिहासाकडे नजर टाकली तर असे लक्षात येते की सुरुवातीच्या काळात ग्रीक लोक बरेच प्रभावी होते. युरोपचा बराचसा भाग त्यांच्या अधिपत्याखाली होता. कालांतराने त्याचा प्रभाव कमी होऊन रोमन लोकांनी त्यांची जागा घेतली. त्यामुळे या दोन संस्कृतींचा युरोपावर दांडगा प्रभाव पडलेला आहे. ग्रीक आणि रोमन दोन्ही मंडळी कलाप्रेमी होती. युद्धसाहित्याबरोबरच इतर अनेक उपयोगी वस्तू विकसित करण्याचा ते प्रयत्न करीत असत. शिल्पकारांना प्रोत्साहन देऊन त्यांनी अनेक पुतळे बनवून घेतले, चित्रकारांना प्रोत्साहन देऊन त्यांनी अनेक चित्रे काढून ठेवली. याच वस्तूंचा संग्रह आपल्याला या दालनात पाहायला मिळतो. त्याच्या शेजारच्या दोन खोल्या (खोली क्र. १९ आणि २०) संपूर्णपणे इजिप्तसाठी दिलेल्या आहेत. इजिप्तमधील पिरॅमिड हा एक सर्वत्र चर्चेचा विषय आहे. त्यात सापडलेल्या मम्मीज, म्हणजे मसाला घालून ठेवलेले मृतदेह वेगवेगळ्या संग्रहालयात पाहायला मिळतात. त्यांतील काही याही संग्रहालयात ठेवलेल्या आहेत. मम्मीजचा विचार केला तर हे संग्रहालय त्यादृष्टीने फारसे श्रीमंत नाही. परंतु इजिप्तमधल्या इतर अनेक वस्तूंचा संग्रह येथे चांगल्या पद्धतीने ठेवलेला आहे. ते पाहून आपण बाहेर पडतो ते जिन्याजवळच्या २३ आणि २४ क्रमांकाच्या दालनांत येतो. २३ क्रमांकाच्या दालनात जवळच्या पूर्वेकडील देशातील प्राचीन वस्तू (Ancient collection of near East) आपल्याला पाहायला मिळतात. यात समावेश होतो युएई, कुवैत, कतार, इराण या मध्यपूर्वेतील देशांचा. त्याच्या शेजारच्या लहानशा २४ क्रमांकाच्या खोलीत संग्रह आहे सुदान या देशाचा. आफ्रिकेमधील हा एक महत्वाचा देश आहे. आम्हांला वरच्या मजल्यावर जायची घाई असल्याने येथे फारसा वेळ खर्च न करता आम्ही जिन्याने वर गेलो.

वरच्या मजल्यावर ५ दालने आहे. त्यांतील तीन दालने (क्र. १ ते ३) ब्रिटीश वस्तूंसाठी आणि दोन दालने

(क्र. ४ आणि ५) फ्रान्समधील वस्तूंसाठी आहेत. तिसऱ्या क्रमांकाच्या दालनात १६ ते १८ व्या शतकातील ब्रिटिश वस्तू, दुसऱ्या क्रमांकाच्या दालनात १९ व्या शतकातील ब्रिटिश वस्तू तर पहिल्या क्रमांकाच्या दालनात १९ ते २० व्या शतकातील बिटिश वस्तू ठेवलेल्या आहेत. त्याचप्रमाणे चौथ्या क्रमांकाच्या दालनात १४ ते १६ व्या शतकातील फ्रेंच वस्तू तर पाचव्या क्रमांकाच्या दालनात १९ ते २० व्या शतकातील फ्रेंच वस्तू ठेवलेल्या आहेत.१६ व्या शतकापासून युरोपातील हे दोन देश ब्रिटन आणि फ्रान्स प्रगतीच्या वाटेवर वाटचाल करू लागले. या प्रगतीमध्ये नजरेत भरण्यासारखी प्रगती दिसते ती विज्ञानातली. त्याचबरोबर कला, साहित्य, संगीत अशा अनेक क्षेत्रांत या देशांनी प्रगती साधली. त्यामुळेच तर ते आपले साम्राज्य पसरविण्यात यशस्वी ठरले. १६ ते २० या पाच शतकांतील ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या नेत्रदीपक प्रगतीचे परिणाम सर्व जगावर झाले. त्याची साक्ष ही पाच दालने देतात. पुतळे, चित्रे, नाणी, भांडी अशा अनेक प्रकारच्या वस्तूंचा मोठा संग्रह आपल्याला येथे पाहायला मिळतो. काय पाहावे आणि काय वाचावे असे होऊन जाते. आमच्या विद्यार्थ्यांचे आम्ही लहानलहान गट केले. एका गटाने एक विभाग सविस्तर पाहायचा आणि काय पाहिले हे संध्याकाळी इतरांना सांगायचे असे ठरले होते. परंतु संग्रहच एवढा भव्य, की लक्षात ठेवणेही कठीण होऊन जाते.

ब्रिटीश आणि फ्रेंच वस्तूंसाठी राखून ठेवलेली पाच दालने संपली की आपण परत वळतो ते नवीन इमारतीकडे. या आधी नवीन इमारतीतून जुन्या इमारतीकडे तळमजल्यावरून आम्ही आलो होतो. आता उलट वाटेने पण वरच्या मजल्यावरून आम्ही जात होतो. तळमजल्याप्रमाणेच या मजल्यावरदेखील दोन इमारतींना जोडणारा कॉरिडॉर म्हणजे एक दालनच होते. त्याचा क्रमांक होता ६ आणि या दालनात इटलीतील १४ ते १६ व्या शतकातील वस्तू लावून ठेवलेल्या होत्या. कॉरिडॉर संपवून आपण ७ व्या क्रमांकाच्या दालनात प्रवेश करतो. तेथेदेखील इटलीतील १६ ते १८ व्या शतकातील वस्तूंचा संग्रह आपल्याला पाहायला मिळतो. कलेच्या क्षेत्रात इटलीचे स्थान फार वरचे आहे. दालन क्रमांक ६ आणि ७ यामध्ये ठेवलेल्या वस्तूंवरून आपल्याला त्याची खात्री पटते. या वस्तूंमध्ये पुतळे, चित्रे, भांडी, आरसे अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे. प्रत्येक वस्तूमध्ये कलाप्रेमी इटालियन माणसाची झलक आपल्याला पाहायला मिळते. एकाच देशातल्या एवढ्या वस्तू यांनी कशा मिळविल्या असतील, असा विचार आपल्या मनाला चाटून जातो. तसे पाहता हा प्रश्न आपल्याला प्रत्येक दालनातच भेडसावीत असतो. परंतु जेथे जेथे जेथे ब्रिटीशांचे राज्य होते तेथून वस्तू आणणे त्यांना सोपे गेले असावे. परंतु इटलीवर तर त्यांच्या अंमल कधीच नव्हता. उलट रोमानांनीच इंग्लडवर राज्य केले. तरीही एवढ्या वस्तू कशा मिळविल्या असतील हा प्रश्न भेडसावत राहतो.

ज्या इमारतीतून आम्ही संग्रहालयात प्रवेश केला, त्याच इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आम्ही पोहोचलो होतो. या मजल्यावर खोली क्र ७ ते १७ अशी ११ दालने आहेत. खोली क्र. ७ मध्ये इटालियन, ८ मध्ये स्पॅनिश, १५ मध्ये डच वस्तू ठेवलेल्या आहेत. ११ व्या क्रमांकाची खोली २० व्या शतकातील कला यासाठी राखून ठेवलेली आहे. क्र. ९,१२,१३ आणि १४ या क्रमांकांच्या खोल्यांना वेगवेगळ्या व्यक्तींची नावे दिलेली आहेत. ९ क्रमांकाच्या खोलीला ग्रॅहम रॉबर्टसनची खोली (Graham Robertson Room), १२ व्या क्रमांकाच्या खोलीला ॲडियन गॅलरी (Adeane Gallary), १३ क्रमांकाच्या खोलीला मेलॉन गॅलरी (Mellon Gallery), १४ क्रमांकाच्या खोलीला शिबा गॅलरी (Shiba Gallery) अशी नावे दिलेली आहेत. ही सगळी नावे वस्तूंचा संग्रह करणाऱ्या व्यक्तींची असून त्यांनी आपला संग्रह या संग्रहालयाकडे सुपूर्द केला. संग्रहालयाने त्यांच्या सन्मानार्थ दालनाला त्यांचे नाव दिले

आणि त्यांनी गोळा केलेल्या वस्तू त्या दालनात ठेवल्या. या दालनातून फिरताना पुण्याच्या केळकर संग्रहालयाची आठवण आल्यावाचून राहात नाही. सतत परिश्रम करून मिळेल त्या वस्तू आणून त्याच्या मदतीने केळकरांनी पुण्यात एक मोठे संग्रहालय उभारले आहे. तसेच यातील प्रत्येकाने आपले संग्रहालय उभारले आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यातून आणलेल्या वस्तू येथे एकत्र ठेवलेल्या आहेत. त्यांची दृष्टी आणि त्यांचे परिश्रम याचे कौतुक करीतच आपण या दालनांमधून बाहेर पडतो.

दालन क्रमांक १०,१६,१७ आणि १८ चा चार दालनांचा वेगळा उल्लेख करण्याची गरज आहे. दालन क्रमांक १० चा आकार अष्टकोनी असून त्याला अष्टकोनी दालन (Octaqon Gallery) असेच नाव आहे. त्याच्या आठही बाजू वेगवेगळ्या वस्तूंनी व्यापलेल्या आहेत. दालन क्रमांक १६ ही छपाईची खोली आहे. पण तेथेदखील छपाई व्यवसायाशी संबंधित अनेक वस्तू ठेवलेल्या आहेत. खोली क्र. १७ मध्ये केवळ फुलांची रंगीत चित्रे आहेत. जगभरातल्या चित्रकारांनी काढलेली फुले आपल्याला येथे एकत्रितपणे पाहायला मिळतात. १८ क्रमांकाची खोली तळमजला आणि पहिला मजला यांच्यामध्ये आहे. याला मित्रांची खोली (Friends Room) असे म्हणतात. ती मित्रांना गप्पा मारण्याची खोली असावी असे आमच्याबरोबरच्या काही विद्यार्थ्यांना वाटले म्हणून ते तिकडे जाऊ लागले. परंतु दारातच त्यांना अडविण्यात आले. ती संग्रहालयाच्या मित्रांची खोली आहे. इंग्लंडमध्ये संग्रहालयात प्रवेश विनामूल्य आहे. परंतु त्याची देखभाल करण्यासाठी खूप खर्च येतो. यांतील काही खर्च सरकार उचलते, बाकीचा खर्च देणग्यांमधून भागविला जातो. जी कोणी व्यक्ती संग्रहालयाला देणगी देते त्या व्यक्तीला संग्रहालयाचा मित्र मानले जाते. त्यांना Friends of Museum असा किताब देण्यात येतो. अशा सर्व व्यक्तींसाठी राखून ठेवलेली ती खोली आहे. तेथे येऊन ते अभ्यास करू शकतात. त्यांना वाचनालयातून पुस्तके नेण्याचीदेखील मुभा असते.

फ्रेंड्स रूम बघण्याच्या निमित्ताने आम्ही मधल्या (Mazanine) मजल्यावर आलोच होतो. तेथून जिन्याने आम्ही तळमजल्यावर आलो. क्लॉक रूममध्ये ठेवलेल्या आमच्या बॅगा घेतल्या आणि उपहारगृहात गेलो. थंडी चांगलीच होती. त्याचबरोबर संग्रहालय फिरून आम्ही थकलो होतो. या पार्श्वभूमीवर चहाची गरज होती. चहा घेऊन तरतरी आल्यावर प्रत्येकजण संग्रहालयाच्या दुकानात खरेदी करण्यात मशगुल झाला. आम्ही संग्रहालयात गेलो तेव्हा आमच्या बॅगा रिकाम्या होत्या. परंतु संग्रहालयातून बाहेर पडताना मात्र आमच्या बॅगा भरलेल्या होत्या. केवळ बॅगांतच भर पडली असे नाही तर संग्रहालय पाहून आमच्या ज्ञानात देखील चांगलीच भर पडली होती.



संग्रहालयाच्या पायऱ्यांवर घेतलेले छायाचित्र

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,काटई,
ता. कल्याण जि. ठाणे - ४२१२०४

●●●

# ''पंचीकरणम्''

(आचार्य श्री शंकर भगवत्पाद)

*आदि शंकराचार्यांच्या 'पंचीकरणम्' या एका लहान प्रकरणासंबंधातील हा परिचय वजा लेख आहे. - संपादक*

आदि शंकराचार्य यांचे नाव त्यांनी मांडलेल्या अव्दैत तत्त्वज्ञानामुळे चिरंतन झाले आहे. उण्यापुऱ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यांत त्यांनी महान व अलौकिक ग्रंथ संपदा निर्माण केली. गीता, उपनिषिदे व ब्रह्मसूत्र यांवरील त्यांनी लिहिलेली भाष्ये अतुलनीयच आहेत. ''पंचीकरणाम्'' हा त्यांच्या ग्रंथ संपदेतील एक आकाराने लहानच पण गूढ अर्थाने महान प्रकरण ग्रंथ आहे.



आचार्यांनी या ग्रंथातून अव्दैत तत्त्वज्ञानाचीच मूलभूत मांडणी अतिसंक्षिप्तपणे केलेली आहे. केवळ ब्रह्मच खरे असून जग मिथ्या (खोटे) आहे हा अव्दैत तत्त्वज्ञानाचा भाग आहे. या निव्वळ भासमान जगाच्या रचनेचे कोडे येथे आचार्यांनी उलगडले आहे. तसेच ओंकाराचे रहस्यही मोठ्या खुबीने साररूपात मांडले आहे. याच विषयाचा उहापोह माण्डुक्य उपनिषदांत आढळतो. किंबहुना ''पंचीकरणम'' हे याच उपनिषदावरून बेतलेले दिसते. आचार्यांचे शिष्योत्तम सुरेश्वराचार्य यांनी या ऊतिसंक्षिप्त प्रकरण ग्रंथावर तब्बल चौसष्ट श्लोकांची वार्त्तिका लिहिली. या वर्तिकेमध्ये सुरेश्वराचार्यांनी मूळ पंचीकरणाचा विस्तार, खुलासवार मांडणी आणि टीका टिप्पणी ही पंडित्यपूर्ण लालित्याने केली आहे. सुरेश्वराचार्य हे आचार्यांचे शिष्य त्यांच्यापेक्षा वयाने मोठे होते. पूर्वाश्रमीचे ''मंडनमिश्र'', म्हणजेच हे सुरेश्वर्याचार्य. मंडनामिश्रांना आचार्यांनी बौद्धिक वादविवादांत पराभूत केले. परिणामस्वरूप मंडनमिश्रांनी आचार्यांचे ''शिष्यत्व'' पत्करले म्हणूनच त्यांच्यात अनुयायाची विनम्रता आणि मुक्तचिंतकाचे समर्थ स्वातंत्र्य असा मेळ होता.

आता या मूळ प्रकरण ग्रंथाकडे वळण्याआधी मूळ देववाणी संस्कृतमधील आचार्यांची रचना पाहू.

॥ पंचीकरणम्॥

ॐ पंचीकृत पंचमहाभूतानि तत्कार्यंच सर्व विराडित्युच्यते। एतत्स्थूल शरीर मात्मन:। इन्द्रियैरर्थोपल ब्धिजीगारितम्। तदुभयाभिमान्यात्मा विश्व:। एतत् प्रथमकार:॥ (ॐकार)

अपंचीकृत पंचमहाभूतानि, पंचतन्मात्राणि, तत्कार्यंच पंच प्राणा:, दशेन्द्रियाणि, मनोबुद्धिश्चेति सप्तदशकं लिंगम् भौतिकम् हिरण्यगर्भ इत्युच्यते। एतत्सूक्ष्म शरीरात्मन:। करणे षुपसंहतेषु जागरित संस्कारज: प्रत्यय:स विषय: स्वप्न इति उच्यते। तदुभयाभिमान्यात्मा तैजस: एतत् प्रयमुकार:। (ॐकार)

शरीरद्वयकारणमात्माज्ञानं साभासमव्याकृतामित्युच्यते। एतत् कारणशरीरमात्मन: तच्च न सन्नासन्नापि सदसन्न भिन्नं नाभिन्नम् नापि भिन्नाभिन्नं, न निरवयवं, न सावयवं नोभयं किंतु केवळ ब्रह्मात्मैकत्व ज्ञानापनोद्यम्। सर्वप्रकारज्ञानोपरुंहारे बुद्धे: कारणात्मनाऽवस्थानं सुषुप्ति:। तदुभयाभिमान्यात्मा प्राज्ञ:। एतत्त्रयम् मकार:॥('मकार')

ॐ

श्रीमच्छंकराचार्यविरचितम्

**पञ्चीकरणम्**

PAÑCIKARAṆAM

*A small treatise on Vedānta*

*by Bhagavān Śrī Śaṅkarācārya*

**ॐ पञ्चीकृतपञ्चमहाभूतानि तत्कार्यं च सर्वं विराडित्युच्यते। एतत्स्थूलशरीरमात्मन:। इन्द्रियैरर्थोपलब्धिर्जागरितम्। तदुभयाभिमान्यात्मा विश्व:। एतत् त्रयमकार:॥**

ॐ *Aum* विराट् इति *Virāṭ*, उच्यते is said, to be the aggregate of सर्वं all, the पञ्चीकृत-पञ्च-महाभूतानि quintuplicated five elements, च and, तत्कार्यं their effects. एतत् This, is the स्थूलशरीरम् gross body, आत्मन: of the Ātman. जागरितम् Waking, is that state, where इन्द्रियै: the senses, अर्थ-उपलब्धि: give rise to the knowledge of objects. आत्मा The Ātman, अभिमानी who has the sense of ownership, in relation to तत् उभय—both the waking state and the gross body, is called विश्व: the *Viśva*. एतत् These त्रयम् three, together are represented by अकार: the first letter 'A' in '*Aum*'.

AUM. The *Virāṭ* is said to be the sum total of all the quintuplicated[1] five elements and their effects. This is called the gross body of the Ātman. Waking[2] is that state, where the senses give rise to the knowledge of objects. The Ātman which identifies Itself with both the waking state and the gross body is

### पंचीकरण ग्रंथातील एक पृष्ठ

अकार उकारे, उकारो मकारे, मकार ओंकारे, ओंकारोऽहम्येव। अहमात्मा साक्षी केवलश्चिन्मात्र स्वरूप:, नाज्ञानं नापि तत्कार्यं किंतु नित्यशुद्ध बुद्धमुक्तसत्यस्वभावं परमानन्दाद्वय प्रत्यग्भूतचैतन्यं ब्रह्मैवाहमस्मीत्यभेदोनावस्थानं समाधि:।

'तत्त्व मसि ब्रह्म' ''ब्रह्माहमस्मि'' ''प्रज्ञानमानन्दं ब्रह्म'' अयमात्मा इत्यादिश्रुति भ्य:। इति पंचीकरणं भवति॥

इति श्री शंकराचार्यविरचितं पंचीकरणम्।

ॐ विराट म्हणजे पंचीकृत पाच महान मूलतत्त्वे (आकाश, वायु, तेज, पाणी, पृथ्वी) व त्यांचे परिणाम यांची गोळा बेरीज. यासच आत्म्याचे स्थूल रूप मानतात. जाग्रत अवस्था म्हणजे इंद्रिये जेव्हा व जेथे दृश्य वस्तूंचे ज्ञान प्राप्त करून देतात ती अवस्था. आता आत्मा ज्याचे मुळे जाग्रत अवस्था आणि स्थूल स्वरूप शरीर व्यक्त होते त्यास ''विश्व'' म्हणतात. स्थूल शरीर, जाग्रत अवस्था आणि विश्व या तिघांचा उल्लेख एकत्रितपणे 'अ' काराने करतात. हा 'अ' कार हीच ओंकाराची वा प्रणवाची पाहिली मात्रा आहे.

पंचीकरणापूर्वीची पाच मूल महाभूते, त्यांचे परिणाम (कार्य) सूक्ष्म शरीर यांना मिळून 'हिरण्यगर्भ' म्हणतात. सूक्ष्मशरीर सतरा भागाचे आहे. पाच प्राण, दहा इंद्रिये (पाच ज्ञानेंद्रिये + पांच कर्मेंद्रिये) मन व बुद्धी यांचा समावेश होतो. जेव्हा ज्ञानेंद्रिये काम करत नसतात, तेव्हाची जी जाणीव जी जागेपणीच्या प्रतिमावरून आकार घेतलेल्या अवस्थेस ''स्वप्नावस्था'' असे संबोधतात. स्वप्नावस्था व सूक्ष्मशरीर यांचा मिळून तैजस आत्मा होतो. सूक्ष्म शरीर, स्वप्नावस्था व तैजस आत्मा यांचा समूह प्रणवातील 'उ' काराने दाखविला जातो.

चैतन्य आणि माया यांनी लपविलेला आत्मा जो स्थूल आणि सूक्ष्म शरीरांना कारणीभूत असतो त्याला ''काव्याकृत'' (अविकारी) म्हणून ओळखतात, हेच आत्म्याचे 'कारण शरीर' होय. याचे गुणधर्म हे आहेही आणि नाहीही, भिन्नही नाही अभिन्नही नाही, निरवयव नाही सावयवही नाही परंतु केवळ ब्रह्म आणि आत्मा यांच्या जाणीवेनेच वेगळा काढता येतो.

जेव्हा सर्व विचार संपतात, तसेच जेव्हा बुद्धी (प्रज्ञा) कारण आत्म्याच्या अवस्थेत पोहोचते त्या अवस्थेस ''सुषुप्ती'' (गाढ निद्रा) म्हणतात. कारण शरीर आणि

सुषुप्ती हे एकत्रितपणे असतात त्यास ''प्राज्ञ'' म्हणतात. कारण शरीर, सुषुप्ती (गाढ निद्रा), व प्राज्ञ या तिघांचा उल्लेख 'म' या प्रणव मात्रे ने करतात.

ओंकारातील सुरुवातीचा 'अ' कार हा 'उ' कारात - म्हणजे जागृत ''विश्व'' हे व्यक्तिमत्त्व ''तैजस'' या स्वप्नातल्या व्यक्तिमत्त्वात - तर 'उ' कार हा 'म' कारांत - अर्थात तैजस हे स्वप्न व्यक्तिमत्त्व प्राज्ञ या गाढनिद्रा व्यक्तिमत्त्वात विलीन व्हावे तर 'म' कार ओममधून शेवटी ओंकारात विलीन व्हावा. ओंकारो ऽ हम्येव म्हणजेच अहमि एव (मीच), मी आत्मा आहे. आत्मा केवळ शुद्ध चैतन्याचे स्वरूप मात्र आहे. आत्मा माया ही नाही ना मायेचा परिणाम, तो आहे केवळ ब्रह्म, अविरत शुद्ध, अविरत ज्ञानी, अविरत मुक्त, आणि निखळ निव्वळ अस्तित्व. आत्मा आहे परम आनंदाचे निधान, एकमेवाद्वितीय, कैवल्यमय यासच ''समाधी'' असे संबोधन आहे.

'तत्त्वमसि' (तो तूच आहेस) 'ब्रह्माहमस्मि' (मी ब्रह्म आहे) 'प्रज्ञानमानंद ब्रह्म' (चैतन्य आनंद निधान हे ब्रह्म) आणि 'अयमात्मा ब्रह्म'(हा स्वत:च ब्रह्म आहे) ह्या उपनिषिदांमधील उक्ती ह्याच पूर्ण साक्षीस्वरूप आहेत आत्मा (वैयक्तिक आत्मा) आणि ब्रह्म यांच्या परिपूर्ण परिचयाच्या. हेच आहे पंचीकरण - शंकराचार्यकृत.

या लहानशा प्रकरण ग्रंथावरील सुरेश्वराचार्यांनी रचलेली चौंसष्ट श्लोकी वर्त्तिका खूपच सविस्तर आणि खुलासेवार आहे. पण तो स्वतंत्र लेखाचा विषय ठरतो.

**श्री. अविनाश पाठक**
११ निसर्गदत्त, बांद्रा पश्चिम, रिक्लेमेशन,
मुंबई - ४०००५०
दूरध्वनी - २६४३७७४०
Email : as.pathak@hotmail.com

●●●

## *एक वेगळे मासिक वृत्तपत्र*

The Art Newspaper या नावाने आंतरराष्ट्रीय आवृत्ती निघणारे एक वेगळे मासिक आहे. जगभरातल्या कला विश्वातील घडामोडी त्यांना असणारे सामाजिक, राजकीय संदर्भ, अर्थशास्त्राचे व इतर संदर्भ असणाऱ्या लहान मोठ्या बातम्या, लेख हे या मासिकाचे वैशिष्ट्य आहे. जगभरात वस्तुसंग्रहालय शास्त्रात इतके काही नवनवीन घडत असते. त्याची आपल्याला कल्पनाही येणार नाही. वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे लिलाव त्यांच्याबाबत घडणाऱ्या असंख्य घटना, या संस्थांचे प्रमुख (क्युरेटर), प्रदर्शने अशा विविध बातम्या यात असतात. शिल्पकला, छायाचित्र, संवर्धन इतर असंख्य कला यांवरील बातम्या यात पहायला मिळतात. शिवाय मुलाखती, पुस्तक परीक्षणे, जाहिराती.... हे सर्व वाचले की क्षणभर काही कळेनासे होते. वस्तुसंग्रहालयशास्त्र आपल्याकडे फारसे विकसित नाही. पण पाश्चात्त्य जगात एक विषय घेऊन त्या विषयाचे वस्तुसंग्रहालय अशी कितीतरी उदाहरणे आहेत. वॉशिंग्टन लाइफ सायन्सचे एक वस्तुसंग्रहालय पाहिले. तेव्हा आम्हांला एक दिवसही पुरला नाही, इतकी प्रचंड वस्तुसंग्रहालये तिकडे आहेत. या मासिक वृत्तपत्राची सुरुवात १९८३ मध्ये झाली. माझ्या हातात आता मे २०१२ चे जे वृत्तपत्र आहे, त्याची मोठ्या आकारातील पृष्ठे ८८ आहेत. हे वृत्तपत्र एक उत्सुकता म्हणून तरी चाळावे. या वृत्तपत्राचे संकेत स्थळ :
www.theartnewspaper.com या नावाने आंतरजालावर उपलब्ध आहे.

- मोहन पाठक, ठाणे.

पुस्तक परिचय - १

# कट्टा

*शारदा प्रकाशाने प्रकाशित केलेल्या 'कट्टा' या पुस्तकाचा हा गोटक परिचय*

क्षितिज कुलकर्णी या एन. के. टी. तील माजी विद्यार्थ्याची 'कट्टा' ही पहिलीच साहित्य कलाकृती. कॉलेज लाईफ म्हणजे फूल्टू धमाल, मस्ती, यारी दोस्ती, प्यार नफरत, तिचा 'तो', त्याची 'ती' बरेचदा वन-वे ट्रॅफिकही, स्वत:ला शोधण्याचं, हरवण्याचं, गवसण्याचं, मित्र, मैत्रिणी, प्राध्यापक यांच्यात रमणार एक वेडं वय, एक बेफाम बेधुन्द जग. आयुष्यातला एक अनोखा पिरियड जो हृदयाच्या कुपीत अत्तरासारखा जन्मभर जपून ठेवावा असा अविस्मरणीय असा काळ जो प्रत्येकाच्याच आयुष्यात येऊन गेलेला असतो. समाज परिस्थिती काळ बदलतोय त्याप्रमाणे त्यातही बदल झालेला आहे तरी पण प्रत्येकाला त्याचा हा काळ नक्कीच चिरस्मरणीय वाटत असतो.

'स्वत:चा, मित्रांचा, तरुणाईचा 'वॉईस' असणारी हक्काची जागा म्हणजेच हा कॉलेजचा कट्टा प्रत्येक मित्र - मैत्रिणीसाठी तरुण असणाऱ्या प्रत्येकासाठी दोस्तीवर जान कुर्बान करण्याचं, कोणावर तरी 'प्रेम' करण्याचं जिगर ठेवणाऱ्यांसाठी - दोस्तीचं डेस्टीनेशन - कट्टा! असं मलपृष्ठावर लिहिलेलं आहे. ते या कट्ट्याचं खरं खुंर अंतरंग आहे.

शारदा प्रकाशनने हे आपल्या नेहमीच्याच पद्धतीने पुस्तक प्रकाशित केलं आहे. 'तरुणाई, तरुणाई हसती गाती लहराती अपूर्वाई' आनंद बेहेरे याचं कट्ट्याचं बेफाम मुखपृष्ठ. 'स्पंदन' ही कट्ट्यावरल्या प्रेमकथेचं वर्णन करणारी कविता सारंच कट्ट्याची पार्श्वभूमी तयार करण्यात मोलाचा वाटा उचलणारं आहे.

मित्राच्या नावाचा उल्लेख न करताच आपल्या 'मैत्री' ला लेखकाने हा कट्टा अर्पण केला आहे. नावापेक्षा मैत्री मोठी आहे आणि नात्याचं सौंदर्य जपण्याचाच त्यामागे हेतू आहे हे लेखकाने स्पष्ट केलं आहे. कट्टा हा खडबडीत असला तरी त्याच्यावरच बसायला आवडतं, त्याची सर वेलव्हेट खुर्चीला कशी येईल? तो काळ, त्या भावना प्रामाणिक, अस्सल असतात. असेच सच्चे दिवस जगणाऱ्या एका ग्रुपची ही छोटीशी गोष्ट आहे. कॉलेज दिवस हे असतात हे सांगण्यासाठी हे लेखकाचे निवेदन आहे. पुढे माणसं खोट्याच्या दुनियेत रंगून जातात.

'कट्टा' हा पहिलाच प्रयत्न आहे. कॉलेज लाईफकडे भेटलेल्या विलक्षण माणसांना एका काल्पनिक तरीही कुठेतरी सत्य असणाऱ्या अशा कथेत गुंफण्याचा हा 'ट्राय' आहे. या 'कट्ट्याला' प्रत्यक्षात आणण्यामागे भरपूर सिमेंट - दगड-विटा-वाळू आहे. अशा शब्दांत लेखकाने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

नव्या कोऱ्या करकरीत पेननं डायरीत या कट्ट्यावरची धमाल, सुख-दु:ख, गुपितं, मौज मजा, मस्ती, कूल-हॉट, कॉल्स- मिसकॉल्स या साऱ्यांविषयी लिहिणारा विवेक त्याचे फ्रेंडसर्कल स्मार्ट हुशार अभिजित, उनाड जतिन, पाण्यासारखी तनया, भोळी बिचारी बेडर.. विदुला ही पात्रं यात आहेत. शिवाय सृष्टी, प्रणाली, निता, प्रज्वल गोखले, अजय, मल्हार जाधव इ. मित्र मंडळीशी आहेत.

''आपल्याला राजमुद्रेची JPEG काढून ब्लोअप

प्रेमाच्या माणसांत मानापमान नसतो.

करता येईल. फ्लेक्स नको! it will be costly! अभि म्हणाला. ''तुझ्याकडे सेल नाहीये ना, then just shut up!" विवेक उखडला. "that will be proper yaar!" तो सृष्टीला म्हणाला, ''क्यानात है, मेरी मुर्गी !'' तो जोरात म्हणाला, ''मिसकॉल दिला तरच... नाहीतर वंटास...'' वेडरची तर सर्वात जास्त तोच खेचायचा. तू साले कुछ बोल मत! it sounds awful !!! वेडर उचकली, ''लो अब इनको अच्छा बोलो, तो भी.... f xxx yaar !!'' ''जतिनऽ'' त्या दोघीही किंचाळल्या, तरुणाईच्या तोंडची अशी जादा इंग्लिश व हिंदी मिश्रित मराठी भाषा संपूर्ण कट्टाभर आपल्याला दिसून येते. कट्ट्याची बेफाम लय, धम्माल ठेका क्षितिज कुलकर्णी यांनी कौशल्याने सुरुवातीपासून पकडलाय नि तो शेवटपर्यंत टिकवलाय.

तरुण तरुणींना आपला कट्ट्याचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी व प्रौढांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळवण्यासाठी 'कट्टा' वाचायलाच हवा.

मैत्री, मैत्री काय म्हणतात, ते अनुभवण्याचा खुला रंगमंच म्हणजे कट्टा.

आयुष्याचा ट्रेलर म्हणा हवं तर या कट्ट्याला 'गोल्डन पिरेड' अशा त्या कट्ट्यावरचे दिवस, 'मनातला एक सर्वांत झंझावाती कोपरा हाच तो कट्टा, ते धमाल दिवस.

भंकस, टी. पी. करत, मित्र मैत्रिणीची लफडी-भांडणं सोडवत खात-पित, गात, हसत-रडत हवा तेवढा वेळ घालवता येतो, बसता येतं असा एक काळ ज्याच्यावर घालवला तो खडबडीत पण जीवाचा जिवलग अस्सा कट्टा.

इतरांसाठी जगणं 'सर आँखो पर' अस करणारा कट्ट्याचा काळ.

मस्ताड पावसाचा सुखद शहारा शिडकावा अंगावर झेलण्यासाठी एकदा जायलाच हवं या कट्ट्यावर.

<u>कट्टा</u> - ले. क्षितिज कुलकर्णी, शारदा प्रकाशन, पृष्ठे-१०८, मूल्य - रु.९५/-.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

## शिक्षणाचे चार स्तंभ

- Learning to Know - **ज्ञानप्राप्तीचे अध्ययन करा.** ज्ञानाच्या विविध शाखा उदयाला येत आहेत. सर्वसाधारण शिक्षणामध्ये या ज्ञानशाखांचा परिचय विद्यार्थ्यांना झाला पाहिजे.
- Learning to Do - **संपादित ज्ञानाचे उपयोजन करायला शिका.** ज्ञानाचे उपयोग करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करून त्यांना क्रियाशील ठेवले पाहिजे.
- Learning to Live Together - **एकोप्याने राहायला शिका.** विद्यार्थ्यांत सहकार्याची व आदराची जाण निर्माण केली पाहिजे.
- Learning to Be - **वर्तमानाचे भान ठेवायला शिका.** वर्तमानात सक्षम जगण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे.

दुसऱ्याने माफी न मागताही त्याला क्षमा करण्याचं औदार्य आपल्याजवळ हवे.

पुस्तक परिचय - २

# नांगरल्याविण भुई (कादंबरी)

*ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या नांगरल्याविण भुई या कादंबरीचा हा परिचय आहे. या कादंबरीच्या निमित्ताने ॲलन ट्युरिंग (नायक) ची ओळख आवर्जून करून घ्यावी - संपादक*

पुस्तक हातात घेतल्यावर प्रथम त्यावरील चित्राकडे लक्ष जाते. रेडिओ, टी. व्ही खोलल्यावर त्याच्या आतील मशिनरी जशी दिसते रेझिस्टन्स, तांब्याच्या तारा, तांब्याच्या पट्ट्या, सर्किटस् त्यांची जोडणी वगैरे तसे हे चित्र आहेसे वाटते. आतील चित्रे ही अशीच काहीशी आहेत. चित्रांविषयी ती कशातून घेतली आहेत याचा खुलासा आहे पण कशाची आहेत त्याबद्दल नाही. संपूर्ण कांदबरी वाचल्यानंतर वाटते विचार करणे म्हणजे काय यावर विचार करायला आवडणाऱ्या व त्यावर 'ट्युरिंग मशीन' ची निर्मिती करणाऱ्या ॲलन ट्युरिंग वर ही कादंबरी लिहिली आहे म्हणून विचार विद्युत लहरींची ती संगणकीय चित्रे असावीत. त्यातल्या जाणकारांना ती समजलीही पण सामान्यांना अनाकलनीय अशीच आहेत. त्यातल्या त्यात पेशी विभाजनाचे १५१ पानावरचे चित्र काहीतरी कळते.

ग्रंथालीने प्रकाशित केलेले हे लेखकाचे सातवे पुस्तक या आधीची 'ज्ञानाच्या कुंपणावरून' 'वीसशे पन्नास' 'अंताजीची बखर' 'संप्रति' 'जीवोत्पत्ती आणि नंतर', 'दगडावर दगड, विटेवर वीट' ही नंदा खरे या लेखकाची सर्व पुस्तके ग्रंथालीचीच आहेत. मलपृष्ठावर जेष्ठ वैज्ञानिक जयंत नारळीकर व मंगला नारळीकर यांचे अभिप्राय आहेत. अर्पण पत्रिका, ''माझ्या आत्या, मावश्या, काक्या आणि माम्यांना, माझ्या अनेकानेक कल्पक यंत्रज्ञ-तंत्रज्ञ सहकाऱ्यांना आणि,

*'मितवा, ओ मितवा, तुझको क्या डर है रे।*
*ये धरती अपनी है, अपना अंबर है रे॥*

असे मस्तीत म्हणणाऱ्या 'लगान' टीमला! अशी जरा वेगळी आहे.

खाली लेखकाची टीप आहे की कांदबरीतील काही पात्रे ऐतिहासिक, तर काही काल्पनिक आहेत. घटनाही काही ऐतिहासिक तर काही काल्पनिक आहेत. हे असे घडले नाही. म्हणून ते खोटे ठरत नाही.

अनुक्रमणिका - 'एक आणि एक दोन' त्याची २१ प्रकरणे आहेत. 'पुरेसे आणि आवश्यक' याची दहा प्रकरणे, 'नांगरल्याविण भुई' याची २८ प्रकरणे व 'खुडित स्वपुस्पे' याची आठ प्रकरणे ही प्रकरणे छोटी छोटी आहेत. त्या प्रकरणांना शीर्षके दिलेली नाहीत नुसते क्रमांक आहेत. सर्वच आकडे इंग्रजीत आहेत. शेवटले 'डिप द ॲपल इन द ब्रू' यानंतर १) खरा ॲलन ट्युरिंग २) खरा रामानुजन ३) समलिंगी वृत्ती ४) इतर सारे ही चार परिशिष्टे जोडली आहेत. का लिहिले हे? याबद्दल स्पष्टीकरण थोडक्यात पण पोटतिडिकेने दिले आहे. त्या आधी संगणकाचा 'खरा इतिहास' दिला आहे.

ॲलन ट्युरिंग मला पाहिल्याने १९८० साली भेटला. त्याच्या मृत्यूनंतर सव्वीस वर्षांनी आणि भेटत राहिला आवडला मला. एक अव्वल दर्जाचा गणिती, 'टॉप टेन मधला विसाव्या शतकातला, 'ट्युरिंग मशिन' चा जनक पण आज त्याचे नावही न ऐकलेले कोट्यावधी लोक संगणक वापरतात.

त्याने आयुष्यभर अन्याय व एकटेपणेच भोगले. बेचाळीस वर्षाच्या आयुष्यात 'कुटुंब सौख्य' सव्वा वर्षापासून सलग महिनाभर असे मिळालेच नाही यातून

आपल्या यशात इतरांचाही वाटा असतो.

उद्भवलेली समलिंगी वृत्ती. चोविसाव्या वर्षी गहन तार्किक प्रश्न सोडवूनही कौतुक लाभले नाही. अणुबाँबच्या घडणीत महत्त्वाचे काम पण दखल घेतली गेली नाही. 'तू जिथे पोचला आहेस तिथे आम्ही पोचलेलो नाही असे फॉन नायमन ॲलनला म्हणत असे. पण संगणकाचे जनकत्व फॉन नलमनला मिळाले आणि हा विस्मृतीत लोटला गेला. hary a flowers are borle to blush unseen. तिसऱ्यांदा हे होतय शाळेत जिओडेसिक मोशन झाली मग सेंट्रल लिमिट. मी जे महत्त्वाचे प्रश्न सोडवायला घेतो ते कोणी तरी माझ्या आधीच सोडवतो. माझा जन्मच झालाय दुसऱ्या नंबरवर येण्यासाठी ॲलन निराशेने उद्गारायचा.

जर आयुष्याच्या प्रवासात कौटुंबिक एकटेपणाला शह देणारे संबंध लाभले असते तर! क्रिस - जेम्स, व्हिक्टर - डेनिस पॉर्जी (कापडी टेडीलियर) हे मूठभर मित्र कादंबरीत सीता छत्रे एक सम विचारी गणितील भारतीय स्त्री त्याच्या जीवनात येते. आपल्याला वाटते हिच्याशी जमले तर बरे! पण ती त्याच्यापेक्षा १२ वर्षांनी मोठी असते म्हणून ती त्याची ताईच राहते. प्रत्यक्ष खऱ्या जीवनातही वाङनिश्चयापर्यंत जाऊन एका भाषातज्ज्ञ गणिती स्त्रीशी असलेली त्याची मैत्री तुटली. मग आयुष्यभर पळणे, पॉर्जी, व्हिटॅमिन बनवणे, हीच लाख दु:खो की एक दवा ठरली. जेम्सचा मित्र ॲलनला म्हणतो 'यू ब्लडी होमो क्विअर!

एक बी-स्टार रँग्लर, अव्वल दर्जाचा गणिती, तेज विनोदबुद्धी, बुद्धिबळपट, मुलांशी मैत्री करणारा, विक्षिप्त, एकलकोंडा विरुद्ध लिंगाचे शून्य आकर्षण असलेला समलिंगी वृत्तीचा, इंग्लडतर्फे ऑलिंपिकमधे मॅरेथॉन पळण्याच्या तयारीचा. पण हे एकांडे पळणेच अखेर जीवनापासून दूर पळायला, आत्महत्येला कारणीभूत झाले.

प्रस्तावनेत लेखक म्हणतो आदि मानवाला गारगोटी घासून ठिणगी पडते. त्याची शस्त्रे बनविता येतात (चाकू सुरी सारखी धारदार) हा शोध लागला तिथपासून ते उत्तर कोरिया अणुबाँबच्या धमकीने एका महासत्तेची झोप उडवतो इथपर्यंत ज्ञानाच्या क्षेत्रात क्रान्ती झाली पण असे नवे तंत्रज्ञान एखाद दुसरा न्यूटन, आइन्स्टाईनच्याने घडत नाही. तर असल्या प्रकल्पांना अनेकांचे एकत्रितपणे केलेले काम लागते, जिद्द लागते, स्वप्ने, मोकळीक, स्वातंत्र्य लागते. पोटात आग लागते ज्ञानाची, आत्मभावनेची.

अशा एका तंत्रज्ञान घटविण्याच्या घटनेची ही काल्पनिक कहाणी आहे. इथे खऱ्या खोट्याची बरीच सरमिसळ आहे. एका आवडलेल्या माणसावर एक आवडलेली संस्था 'कलम' करायचे सुचले याची पार्श्वभूमी आहे एका मोठ्या तंत्रवैज्ञानिक प्रकल्पाची त्यात लागणाऱ्या विविध क्षमतांची. ॲलन ट्युरिंग हा कादंबरीचा नायक कधीच भारतात आला नाही; पण त्याच्या आईवडिलांच्या कुटुंबाचा भारताशी घनिष्ट संबंध होता. वडील तीस वर्षे आय. ए. एस. अधिकारी म्हणून मद्रास इलाक्यात होते. १९२६ पर्यंत ॲलनचा भाऊ भारतात जन्मला (१९०८) पण ॲलन इंग्लडमधील पॅडिग्टन खेड्यास १९१२ त जन्मला.

संगणक युरोप अमेरिकेत विकसित झाला हे सर्वांना माहीत असूनही लेखकाने हे सर्व कथानक भारतात घडवले आहे. ह्याचे कारण म्हणजे मराठी भाषेत बहादुरी, कर्तबगारी दाखवणाऱ्या कला कलाकृती - साहित्यकृती नाहीत म्हणून लेखक म्हणतो मराठीत परम संगणक, कोयना, चंद्रपूर - तारापूरची उर्जा केंद्र आहे का? तलवारीचा खणखणाट, व तोफाबंदुकांच्या धूमधडाक्याशिवाय शौर्य नसतेच का? ज्ञान -विज्ञान तंत्रज्ञान सोडा, क्रीडाक्षेत्रातली मर्दुमकीही साहित्यात नसावी एकूण काय मराठी कथा कादंबऱ्यांना विचारच मारक ठरतो.

तर या तिरसटपणातून ही कहाणी भारतात घडवली न लाजता! ' हे, का लिहिले?' मधे लेखकाने सांगितले आहे. मिलिंद बोकील यांना गरज आहे मराठीला रोमँटिक

करण्याची वाटते तसे नंदा खरे त्यांना मराठीला कर्तबगार, कर्तृत्ववान, बहादूर, ज्ञान - विज्ञान तंत्रज्ञान निपुण करण्याची गरज वाटते.

'नांगरल्याविण भुई' हे कांदबरीचे शीर्षक अन्वर्थक आहे. कारण भुई नांगरल्याशिवाय उत्तम पीक येत नाही. तसेच नवे तंत्रज्ञान एखाद दुसऱ्या न्यूटन, आइन्स्टाईनच्याने घडत नाही. विचार करण्यासारखी क्रिया करणारे यंत्र ही कल्पना पूर्णत्वापर्यंत विकसित करणारा खरा ॲलन ट्यूरिंगही संगणक उभारू शकला नाही. असल्या प्रकल्पांना अनेकांचे एकत्रितपणे केलेले काम लागते. स्वातंत्र्य मिळवायलाही अनेकांचे बलिदान कारणीभूत होते. पायाच्या भक्कम दगडावर टोलेजंग गगनचुंबी इमारत उभी राहते.

कादंबरी वाचताना ॲलन आपल्यालाही आवडू लागतो. त्याच्या अलौपिक बुद्धिमत्तेला सलाम करावासा वाटतो. त्याच्या एकटेपणातून उद्भवलेल्या समलिंगी वृत्ती कडे सुकलेल्या त्याच्या जीवनाविषयी कणव उत्पन्न होते. असामान्य विद्वतेला असाही शाप असतो का! ज्ञानाला यश-कीर्तीचे कोंदण का लक्षात नाही? असे प्रश्न मनात उभे राहतात. एवढ्या अव्वल गणितीलाही नियतीपुढे शरणागती पत्करावी लागावी ना! याबद्दल वाईट वाटते. कादंबरीतली ॲलनच्या भोवताली वावरणारी जहागिर टाटा, रामानुजन, भिसे, दामोदर कोसंबी, अंखूश टिप्या, पॉर्जी, सीता छत्रे ही पात्रे आपल्यालाच भेटली आहेत असे वाटते, प्रभावी व्यक्तिचित्रणं, ओघवती भाषा शैली यामुळे एका मोठ्या तंत्रवैज्ञानिक प्रकल्पासारख्या विषयावर कादंबरी असूनही ती पूर्ण केल्याशिवाय खाली ठेववत नाही, हे लेखकाचे यश आहे. कादंबरी वाचतांना आपण भान हरपून रंगून जातो, अस्वस्थ होतो, झपाटल्यासारखे होतो, इतके त्या काळाशी, त्या वातावरणाशी, त्यातील माणसांशी एकरूप होउन जातो. इतका कादंबरीचा प्रभाव वाचकावर पडतो की कादंबरी वाचून संपली तरी ॲलन ट्युरिंग आपल्या मनात अजरामर होतो. अशी ही कादंबरी सर्वांनीच वाचायला हवी. व त्या अव्वल दर्जाच्या गणितीला सर्वांनीच सलाम करायला हवा. नव्या पिढीत त्यातून चांगले ते घ्यायला हवे.

**नांगरल्याविण भुई** - नंदा खरे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पृष्ठे - १७९ मुल्य - १५० रु

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

## पर्यावरण

**भूमिपात, रॉक फॉल्स इत्यादी घटना घडण्यामागे कारणं नजरेला अशी ठोस स्वरुपात दिसत नसली तरी जंगल तोडीमुळे वृक्षांची संख्या कमी होते. तो परिसर उजाड होतो. वृक्षतोड झाल्यामुळे माती धरुन ठेवायला तिथे मुळं नसतात; आणि अशा ठिकाणी जर पाऊस जास्त प्रमाणात पडत असेल तर पावसाच्या पाण्याने मातीचे ढीगच्या ढीग वाहून जातात. तर जेथे कोरडे हवामान असेल तेथे कोरड्या मातीचे डोंगरावरून खाली घसरण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे तेथील परिसराचा भूस्तराचा समतोल बिघडतो आणि तो बिघडलेला समतोल अशा विध्वंसक घटना घडून येण्यासाठी कारणीभूत ठरतो.**

# बृहदारण्यक उपनिषद

*इथे पहिल्या दोन ब्राह्मणाबद्दल मूळ संस्कृत परिच्छेद मराठी अनुवाद व विवरण आहे.*

**सामान्य माहिती :**

शतपथब्राह्मण हा शुक्ल यजुर्वेदाचा ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाचा अंतिम भाग म्हणजे हे उपनिषद् आहे. या शुक्ल यजुर्वेदाच्या दोन शाखा आहेत. माध्यंदिन व काण्व. काण्व ब्राह्मण सतरा कांडाचे आहे तर माध्यंदिन ब्राह्मण चौदा कांडाचे आहे. कांडाच्या विभागांना अध्याय म्हणतात. या उपनिषदाचे सहा अध्याय काण्व शाखेच्या ब्राह्मणात सतराव्या कांडात ३ ते ८ अध्यायात आढळतात तर माध्यंदिन शाखेच्या ब्राह्मणात चौदाव्या कांडात चार ते नऊ या अध्यायात आढळतात. श्रीमत् आद्य शंकराचार्यानी काण्व शाखा प्रमाणित मानून त्यावर आपले भाष्य लिहिले आहे.

बृहत् आरण्यक उपनिषद नावाप्रमाणेच इतर उपनिषदापेक्षा कितीतरी मोठे आहे . तसेच विषय प्रतिपादनाच्या दृष्टीनेही श्रेष्ठ आहे. हे उपनिषद् संपूर्ण गद्यात आहे. तुरळक ठिकाणी एखादा श्लोक आढळतो. हे उपनिषद सहा अध्यायांत विभागले असून या सहा अध्यायांचे एकूण सत्तेचाळीस भाग आहेत. त्यांना ब्राह्मण असे नाव आहे या प्रत्येक ब्राह्मणात अनेक परिच्छेद आहेत त्याना कंडिका असे म्हणतात.

या उपनिषदाची आणखी वेगळ्या पद्धतीने एक मांडणी केलेली आढळते. त्या मांडणीप्रमाणे हे संपूर्ण उपनिषद् तीन कांडांत विभागले आहे. त्यांची नांवे १) मधुकांड २) याज्ञवल्क्य कांड ३) खिलकांड, याज्ञवल्क्य कांडालाच मुनीकांड असेही म्हणतात त्या प्रत्येक कांडाचे दोन अध्याय आहेत. पहिल्या कांडात अव्दैत सिद्धान्त उपदेशाच्या स्वरूपात मांडलेला आहे. दुसऱ्या कांडात हा उपदेश कसा योग्य आहे याचे तर्कशुद्ध विवरण केले आहे. आणि तिसऱ्या कांडात उपासना व ध्यान यांचे विविध प्रकार सांगितले आहेत.

मधुकांडात सुरुवातीला कर्मकांड सांगितले आहे. श्रीमत् शंकराचार्यांच्या मते या कर्मकाण्डानंतरच खऱ्या अर्थाने उपनिषदाला प्रारंभ होत आहे. ब्रह्मावर विश्वाचा आरोप करण्यात येत असतो मग त्या पासून होणारे परिणाम याचे वर्णन आले आहे. ही विपरीत जाणीव नाहीशी होऊन ब्रह्म आत्मैक्य ध्यानात आणून दिलेली आहे. याला अपवाद असे नाव आहे. शुद्ध ब्रह्म समजण्यासाठी अध्यारोप व अपवाद या दोनही गोष्टींची आवश्यकता असते असे प्रतिपादन केले आहे. या सर्व पद्धतीला उपदेश, उपपत्ती व उपासना अशी नावे आहेत. विद्यारण्य स्वामीनी आचार्यांच्या भाष्यावर वार्तिक सार ग्रंथ लिहिलेला आहे त्यात ते म्हणतात-

बृहदारण्यके काण्डत्रयं। आद्यं मधु स्मृतम्। द्वितीयं याज्ञवल्वकारण्यं। तृतीयं खिल संज्ञितम्। उपदेश उपपत्ती द्वे उपस्तिच इति ते त्रय:। अर्थ क्रमेण काण्डानां प्राधान्येन निरुपिता:।

संपूर्ण वेदाची शिकवण अशी आहे की चांगल्याचा स्वीकार व वाईटाचा अस्वीकार. मात्र चांगले वा वाईट कसे ठरवायचे? हे सामान्य माणसांना कळणे दुरुपास्तच. हे अनुभवाने व अनुमानानेच निश्चित करावयाचे असते.

आंतरिक शुचिता असेल तर आपण परमेश्वराला जवळचे असतो.

मानवाला भविष्य काळात आपले अस्तित्व राहणार आहे याची निश्चित खात्री झाल्या खेरीज तो चांगले वा वाईट या कडे वळणार तरी कशाला? विशेषत: जे भौतिक वादी आहेत ते तर तात्पुरताच विचार करणारे असतात. हे जाणून श्रुतीने भविष्य काळातही आत्मवस्तूचेच अधिष्ठान असते हे प्रथम सिद्ध करण्याचे ठरविले. हे निश्चित झाल्यासच चांगल्याचा स्वीकार आणि वाईटाचा अस्वीकार हे शक्य होईल. जो माणूस या लौकिक जीवनाला विटलेला आहे त्याचे अज्ञान दूर करुन त्याच्या ठिकाणी आत्मज्ञान उदित करण्यासाठी या उपनिषदाचा उपक्रम आहे.

**या उपनिषदाची सुरुवात शांति मंत्राने केलेली आहे. तो मंत्र असा -**

**ॐ पूर्णमद: पूर्ण मिदं पूर्णात् पूर्णं उदुच्चते।**

**पूर्णस्य पूर्ण मादाय पूर्णमेव अवशिष्यते। ॐ शांति: शांति: शांति:।।** त्रिवार शांतिचा उच्चार केला जातो.

ते (ब्रह्म) पूर्ण आहे हेही (विश्‍व) पूर्ण आहे पूर्णापासून पूर्णच निर्माण होते. पूर्णातून पूर्ण काढले असताही शिल्लक पूर्णच राहाते. असे हे पूर्णरूप आहे.

हे एक पूर्णांकाचे गणित आहे. इथे अपूर्णतेला काहीच स्थान नाही. इथे पूर्णांक म्हणजे अमर्याद ब्रह्म होय. ब्रह्मापासून सारे विश्व निर्माण झालेले आहे. त्यामुळे तेही पूर्णच आहे. तसेच अव्यक्त ब्रह्मही पूर्णच आहे. इथे आकार, लांबी, रुंदी, उंची, वजन, माप याचे गणित नाही. ब्रह्म व्यक्त दशेला येते त्याही वेळी ते अमर्याद ब्रह्मच असते. समुद्रावर उठणाऱ्या लाटा दुसरे तिसरे काही नसून समुद्रातील पाण्याचा आकार मात्र होत. म्हणजे अमर्याद जलतत्वच . आणि ते जलच त्या लाटात असते. समुद्र ही जलाशयाची अथांगता तर लाट ही त्यावर निर्माण होणारी जलाकृती. लाट युक्त अगर लाट विरहित समुद्र हा समुद्रच असतो. याच प्रमाणे सर्वत्र परमात्म स्वरुप ओत प्रोत व्याप्त असून आंतर बाह्य म्हणजे व्यक्त आणि अव्यक्तात तेच तत्व व्यापून राहिले आहे. अशा प्रकारे पूर्णाचे गणित वैदिक ऋषीनी ब्रह्म स्वरूप ध्यानात घेऊन ते आकलन होण्यासाठी मांडले आहे.

**अध्याय पहिला - यात एकूण सहा भाग म्हणजे ब्राह्मण आहेत.**

सर्व यज्ञ क्रियेत अश्वमेध यज्ञ विशेष प्रकारचा आहे. कारण या यज्ञाने हिरण्यगर्भाची, प्राप्ती होते. इथे या यज्ञाच्या उल्लेखाने जो आरंभ करण्यात आला आहे त्याचे कारण या साऱ्या यज्ञक्रिया व्यावहारिक स्वरूपाच्या असून ब्रह्मज्ञानानेच आपले खरे स्वरुप ध्यानात येते. या पहिल्या परिच्छेदाचे नांव अश्व ब्राह्मण असे आहे. इथे अश्वाबद्दल माहिती आहे. यज्ञीय अश्व म्हणजे वैश्विक प्रजापति. हा अश्व त्या प्रजापतीचे रूप धारण करतो. त्यामुळे हे संपूर्ण यज्ञ आध्यात्मिक स्वरूपाचे कसे आहे याचे निरूपण येथे केले आहे.

प्रजापतीशी संलग्न असलेल्या साऱ्या गोष्टी - उदाहरणार्थ काळ,लोक, देवत्व या साऱ्या कल्पना या अश्वावर आरोपित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्याला आपोआपच प्रजापतीचे स्वरूप प्राप्त होते. हा अश्व म्हणजेच प्रजापति असे कल्पून ध्यानासाठी याचा विनियोग करता येतो हे सांगितले आहे. अशा प्रकारच्या ध्यानाने खरोखरीचे यज्ञ न करताही त्या यज्ञापासून प्राप्त होणारे फळ जे ब्रह्मलोक त्याची प्राप्ती करून घेता येते. या प्रमाणे सगुण व निर्गुण या दोन्ही प्रकारे याचा विचार करता येतो. मात्र श्रीमत् आद्य शंकराचार्य आपल्या भाष्यात म्हणतात- ही फळप्राप्ती चिरंतन स्वरूपाची असू शकत नाही. ब्रह्मज्ञानानेच अविद्येचा नाश होतो व त्यानंतरच मोक्ष प्राप्त होतो.

**अश्वमेध यज्ञाचे रूपक :**

**ॐ उषा वा अश्वस्य मेध्यस्य शिर: सूर्य: चक्षु: वात: प्राण: व्यात्तं अग्नि: वैश्वानर: संवत्सर:**

**आत्मा अश्वस्य मेध्यस्य।**

या यज्ञीय अश्वाचे उषा (उष:काळ) हे शिर आहे. सूर्य हा चक्षु आहे, वायु हा प्राण आहे. वैश्वानर अग्नि हा मुख्य, सवंत्सर हा आत्मा आहे (व्यात्तं उघडे मुख)

द्यौ: पृष्ठ अंतरीक्षं उदरं पृथिवी पाजस्यम्।

सर्व लोक ही पाठ आहे, अंतरिक्ष हे पोट आहे; पृथ्वी हे पाय आहेत (पाजस्यं पाय)

दिश: पार्श्वे अवान्तर: दिश: पार्शव: ऋतव: अंगानि

मासा: च अर्धमासा:च पर्वाणि अहो रात्राणि नक्षत्राणि अस्थीनि।

दिशाबाजू, उपदिशा या बरगड्या, ऋतु हे अवयव, महिना व पंधरवडा ही पर्वे म्हणजे सांधे अहोरात्र हे पाय, नक्षत्रे ही हाडे.

नभो मांसानि उवथ्यं सिकता: सिन्धव: गुदा यकृत्च क्लोमानाश्च

पर्वता ओषधयश्च लोमानि उद्यन् पूर्वार्ध: निम्लोचन: जघानार्ध:

यत् विजृंभते ततू विद्योतते यत् विधूयते तत् स्तनयति।

यत् महेति तत् वर्षति वाक् एव अस्य वाक्॥१॥

आकाश म्हणजे मांस वाळू म्हणजे पोटातील अर्धजीर्ण अन्न याच नद्या, यकृत हे पर्वत, हृदयाखालील मांस खंड (फुफ्पुस) हे ही पर्वत, औषधी व वनस्पती म्हणजे शरीरावरील केस, सूर्योदय काल हाच शरीराचा पूर्वभाग आणि सूर्यास्त हा शरीराचा पाठीमागील भाग जांभई म्हणजे चमचमणे, अंग झाडणे म्हणजे मेघ गर्जना, मूत्र म्हणजे पाऊस पडणे, आणि खिंकाळणे म्हणजे शब्द होत.

(कलोमान - फुप्फुस, निम्लोचन - सूर्यास्त)

अहर्वा अश्वं पुरस्तात् महिमानौ अजायत तस्य पूर्वे समुद्रे

योनि: एतौ वा अश्व महिमानौ अजायत तस्य पूर्वे समुद्रे

हयो भूत्वा देवान् अवहत् वाजी गंधर्वान् अर्वा असुरान्

अश्व: मनुष्यान् समुद्र एव अस्य बंधु: समुद्र: योनि:। इति प्रथम ब्राह्मणम्।

या अश्वाच्या पुढे दिवस हा ग्रह (महिमा) उत्पन्न झाला. पूर्व समुद्र हे याचे उत्पत्ति स्थान होय. पाठीमागे रात्र उत्पन्न झाली. पश्चिम समुद्र हे याचे उत्पति स्थान होय हे दोन घोडे ग्रह अश्वाच्या पुढे व मागे उत्पन्न झाले हा घोडा होऊन देवाना वाहून नेता झाला. वाजी होऊन गंधर्वांना अर्वा होऊन असुराना व अश्व होऊन मनुष्याला वहन करू लागला. समुद्र हे याचे उत्पत्ति स्थान तसेच मर्यादा स्थान होय. इथे प्रथम ब्राह्मण समाप्त.

सृष्टी उत्पत्ति आरंभी ब्रह्माने विष्णुला उपनिषद् मंत्राने मंडित केले. म्हणजे उपनिषद् विद्या शिकविली. विष्णूने ती सूर्याला शिकविली. सूर्याने आपला परमभक्त याज्ञवल्क्य याला ती विद्या दिली ज्यावेळी ही विद्या दिली त्यावेळी सूर्याने वाजी म्हणजे घोड्याचे रूप धारण केले होते म्हणून ही विद्या वाजसनेयी झाली. याज्ञवल्क्यानानी ही विद्या कण्वाला दिली त्यामुळे याला कण्वोपनिषद् असेही नांव पडले.

विष्णु म्हणजे व्यापक तत्त्व. तो घोड्याचे सर्व अंग प्रत्यंग व्यापून राहिला आहे. विष्णूचे शरीर यज्ञीय अश्वच होय. अश्वाचे शिर त्याची चार खुरे व शेपूट हीच विष्णूची सहा इंद्रिये होत. वैश्विक संवत्सराची देवता ब्रह्म हे ही संपूर्णपणे यज्ञीय अश्व व आंत्र म्हणजेच नद्या होत ब्रह्म व विष्णूच्या शरीरात जे जे काही आहे हे सारे काही या घोड्याच्या शरीरात आहेत. या घोड्याच्या पुढील भागी व पार्श्वभागी हवनीय द्रव्य असल्याने त्याला महिमान म्हणतात. समुद्र म्हणजे पूर्णता उत्कृष्ट अवस्था.

हय हे परमात्म्याचे नांव आहे (हन - ठार मारणे, या म्हणजे जाणे या दोन शब्दापासून हय हा शब्द बनलेला

आहे. देवाच्या शत्रूला ठार मारत जाणारा वाजी युद्धाचा घोडा. गंधर्व हे घोड्यावर स्वार होऊन युद्ध करत. अर्वा हा शब्द यद्‌धातूपासून झाला, भरधाव धावणारा घोडा. असूर पलायनासाठी हा घोडा वापरीत अश्व जोरात धावणारा घोडा आशु - जलद धावणे यापासून अश्व शब्द झाला मनुष्य अश्वावर आरुढ होऊन युद्ध करत असे इथे विष्णु हाच हय, वाजी अर्वा व अश्व असा झाला आहे. सर्व योनीच्या लोकात विष्णूचे अस्तित्व कसे आहे दाखविले आहे. अश्वाची उत्पत्ती समुद्र मंथनातून झाली उच्चै:श्रवस हा मंथनातून निर्माण झालेला आहे.

संपूर्ण विश्व ब्रह्मा आणि विष्णु यांच्या शरीरात सामावलेले आहे. यज्ञीय हा ब्रह्म विष्णु असा कल्पिल्यामुळे संपूर्ण विश्व या यज्ञीय अश्वात प्रतिष्ठित झाले असल्याचे वर्णन वरील मंत्रातून केलेले आढळते. अशा प्रकारे अश्वाच्या माध्यमातून ब्रह्मा व विष्णु यांचे ध्यान करावे हे सूचित करण्यात आले आहे.

**अध्याय १ द्वितीयं ब्राह्मणम्**

याला अग्नि ब्राह्मण असे नाव आहे. यात एकूण सात परिच्छेद आहेत हा भाग माध्यंदिन शतपथ ब्राह्मणात १०.६.५ या ठिकाणी आढळतो आणि तेथे हिरण्यगर्भ या नावाने अग्नीचे वर्णन केले आहे. तसेच अग्नीच्या स्वरुपाबद्दल आणि स्वभावाबद्दल माहिती आहे, हा अग्नि प्रज्वलित करुन अश्वमेध यज्ञात उपयोगिला जातो. हा अग्नि वैश्विक स्वरुपात अभिव्यक्त होत असल्याचे ही वर्णन आहे. हा अग्नि अश्वाच्या प्रतीका सारखाच ध्यान योग्य आहे. याला प्रजापती विराट वा विराज असे मानून ध्यान करावयाचे असते. विराज याचा अर्थ विश्वातील संपूर्ण अभिव्यक्ती. ही अभिव्यक्ती होण्यापूर्वी म्हणजेच नाम व रूप यात व्यक्त होण्यापूर्वी हे सारे हिरण्य गर्भात दडलेले होते. त्याच प्रमाणे साऱ्या अभिव्यक्तीबद्दल मानावे लागते. म्हणजे अव्यक्तातूनच सारे काही व्यक्त होत असते.

या ब्राह्मणात यज्ञाला अंगभूत असलेल्या अग्नीची उत्पत्ति प्रथम सांगितली आहे. याची सुरवात अशी केली आहे. या भूतलावर स्थूल स्वरूपात काही नव्हते. सर्वच अव्यक्त होते. मात्र याचा अर्थ सर्व काही शून्य असा करू नये. याचा विचार करताना असे म्हटले आहे की इह जगति किंचन. परिदृश्यमानं स्थूलावस्थां वस्तु अग्रसृष्टेः प्राक् नैव आसीत्। सृष्टी प्रारंभी डोळ्यांना सहज दिसणारी कोणतीही अशी स्थूल वस्तू नव्हती. न आसीत् इत्यनेन न शून्यत्वं उच्यते। दिसत नसल्याने सारे काही शून्य होते असे मात्र म्हणता येणार नाही 'असत् कार्य अनभ्युपगमात्'। कारण शून्यातून निर्माण काही होत नसते. असे मानल्यास सशाचे शिंगही निर्माण होईल. घट: प्राकू न आसीत् इति प्रतीतौ घटत्व अवस्था पूर्वभावि पिंडत्व अवस्था विषयकत्व दर्शनेन इह अपि अग्रे न आसीत् इति प्रतीते: परिदृश्यमान स्थूल अवस्था विरोधी अवस्थावत्वं एव अर्थ:। घट दिसत नाही याचा अर्थ त्याचे पूर्व कारण जो मातीचा गोळा त्या अवस्थेत तो दडलेला आहे असेच मानावे लागते त्याच प्रमाणे काही नव्हते याचा अर्थ स्थूल स्वरुपात दृश्यमान काही नव्हते असाच घ्यावा लागेल.

नैव इह किंचन अग्रे आसीत्। मृत्युना एव इदं आवृतं आसीत्। अशनायया।

अशनाया हि मृत्यु: तत् मन: अकुरुत। आत्मन्वीस्थांइति।

स: अर्वन् अचरत् तस्य अर्चत: आप: अजायन्त।

अर्चते वै ये कं अभूत इति तदेव अर्कस्य अर्कत्वम्।

कं ह वा अस्मै भवति यं एवं एवत् अर्कत्वम्।

कं ह वा अस्मै भवति यं एनं एतत् अर्कस्य अर्कत्वम्।

सृष्टीच्या आरंभी इथे व्यक्त विश्व, अगर नाम रूपात्मक दृश्य वस्तू असे काहीही नव्हते. हे सारेच सर्वभक्षक मृत्यूने व्याप्त होते. अशनाया म्हणजे सर्व भक्षक यालाच मृत्यू ही संज्ञा आहे. आपण आत्मवान व्हावे अशी त्याला इच्छा झाल्याने त्याने मन निर्माण केले. मनाने तप केले. त्यातून

उदक निर्माण झाले हे तप कशासाठी? अर्चते कं असा त्याने विचार करताच पाण्यासाठी व सुखासाठी असे त्याच्या ध्यानात आले तप म्हणजे अग्नी होय. म्हणून अग्नीला अर्क हे नाव पडले. सूर्याला ही अर्क असे म्हणतात. हे अग्नीचे अर्कत्व जो जाणतो तो सुख प्राप्त करून घेतो. (कं याचा अर्थ जल व सुख असा आहे.)

मृत्युना एव इदं आवृतं आसीत् अशनायया। मृत्यु शब्देन मृत्यू संज्ञक: अचित् शरीर: कं परमात्मा उच्यते। यस्य अव्यक्तं शरीरं, अस्य अक्षरं शरीरं यस्य मृत्यु: शरीरं अपहतपाप्मा दिव्य: एक: नारायण: इति। अशनाया मृत्यूना दृश्यमानं स्थूलावस्थां जगत् आवृतं आसीत्. लोके बुभुक्षा विशिष्ट: हि पुरुषः जन्तून हिनस्ति अत: बुभुक्षाया: मरणहेत्व त्वेन मृत्युत्वं प्रसिद्धं।

सर्व भक्षक क्षुधारूपी मृत्यूने हे सर्व व्यापून टाकले होते. इथे मृत्यू म्हणजे अचित् शरीरधारी तत्व आणि ज्याचे शरीर अव्यक्त आहे, अव्यय आहे आणि मृत्यूचा ज्याचे शरीर आहे त्या दिव्य पवित्र देही नारायणाला परमात्मा म्हणावे अशी श्रुती आहे. अशनाया याचा अर्थ नेण्याची इच्छा करणारा, स्थूल रुपात दृश्यमान होणाऱ्या जगताला मृत्यू म्हणण्याचे कारण स्पष्ट आहे. व्यवहारात असे आढळते की भुकी माणूस दुसऱ्याची हिंसा करून म्हणजे इतर प्राण्याना मारून आपली भूक भागवतो. म्हणून भुकेला मृत्यू म्हणतात. आपण आत्मवान व्हावे असा त्याने संकल्प केला व मन निर्माण केले. कोणी असे म्हणतील, सृष्टी कर्त्याने सृष्टी विरोधी गोष्ट का केली. याचे ही स्पष्टीकरण असे करण्यात येते की प्रथम निर्मिती केली ती नित्य नूतन राहण्यासाठी संहारही केला. याला अशनाया सर्व भक्षक असे म्हणतात. गीतेतही हेच प्रतिपादन केले आहे 'मृत्यु: सर्वहर: च अहं। इथे मन याचा अर्थ महान बुद्धी, ब्रह्म असा आहे.

आपो वा अर्क: तत् यत् अपांशर: आसीत् तत् समहन्यत्। सा पृथिवी अभवत् तस्यां अश्राम्यत् तस्य श्रान्तस्य तप्तस्य तेजोरस: निरवर्तत अग्नि:।२

पाणी हेच अर्क (अग्नि) होय. पाण्यावर जी साय होती (शेवाळ इत्यादि) ती घनीभूत होऊन पृथ्वी झाली. पृथ्वी निर्माण होताना प्रजापतीला (मृत्यूला) श्रम झाले त्यातून उष्णता निर्माण झाली व त्यामुळे मृत्यू पासून तेजोरस निर्माण झाला तोच अग्नि होय.

तस्य श्रान्तस्य तप्तस्य तेजोरस: निरवर्तत अग्नि:। परमात्मन: श्रान्तश्च

कृतयज्ञस्य तप्तस्य सृज्य वर्ग पर्यालोचनव: शरीरात् तेज:सारभूत: अग्नि: निरवर्तत।

अर्क याचा अर्थ जल होय. आणि हेच अग्नीचे कारण झाले. पाण्यात अग्नी दडलेला आहे. इथे जलाचे वर्णन अभिप्रेत नसून अग्नी अभिप्रेत आहे. पाण्यावर येणारे दाट शेवाळ, फेस इत्यादि घनीभूत होऊन पृथ्वी निर्माण झाली. या निर्मितीमुळे प्रजापती श्रांत झाला. विश्रांती घेत असताना त्याच्यातून तेज निर्माण झाले. ते तेज म्हणजेच अग्नी होय. तोच विराज होय. प्रजापति होय. शरीर इंद्रिये असलेल्या ब्रह्मांडात तो शिरला. हाच पहिला शरीरी मनुष्य होय. तसेच हा अग्नि वैश्विक स्वरूपातही अभिव्यक्त झाला म्हणून हा अग्नि अश्वासारखाच ध्यान योग्य मानला गेला आहे.

स त्रेधा आत्मानं व्याकुरुत आदित्यं द्वितीयं वायु तृतीयं स एव प्राण:

मेधा विहित: तस्य प्राची दिक् शिर: असौ च इर्मौ अप अस्य प्रतीची

दिकू पुच्छं असौच असौच सक्थौ, दक्षिणाच उदीची च पार्श्वे द्यौ:

पृष्ठं अन्तरिक्षं उदरं इयं उरु: स एव अप्सु प्रतिष्ठित: यत्र क्वच इति तदेन प्रतितिष्ठति एवं विद्वान्।३

त्या नवजात विराजने आपल्या शरीर व इंद्रियाचे, आदित्य अग्नि आणि वायु असे तीन विभाग केले तोच हा सर्व विश्वाचा प्राण या तीन रूपानी विभाग केला आहे. पूर्व दिशा हे त्याचे डोके, ईशान्य आग्नेय दिशा त्याचे बाहु पश्चिम दिशा हे त्याचे पुच्छ, वायव्य व नैऋत्य दिशा या दोन मांड्या दक्षिण व उत्तर दिशा अनुक्रमे स्वर्ग लोक व पृष्ठ अंतरिक्ष पोट, पृथ्वी ही छाती असा हा प्रजापतिरूप अग्नि उदकाचे ठिकाणी स्थित आहे हे जाणतो तो ज्या ज्या ठिकाणी जातो तिथे प्राण त्याला स्थिर करतो.

अग्नि: आदित्य: वायु आत्मता त्रिधा विभक्त:। त्रयाणांमध्ये चिति अग्नि आदित्य अपेक्षया वायो: तृतीयत्वं। वायु आदित्य अंशक: एष अग्निः स एष प्राण: परमात्मा तत्र तत् दृष्टि: कर्तव्य: इति यावत्। स एष अग्नि: अर्क इति उत्तरत्र अपि द्रष्टव्यम्।

विराज त्रिधा झाला अग्नि वायु आदित्य म्हणजे तिघेही अंशात्मक झाले. अग्नि व वायु अपेक्षेने आदित्य तिसरा तर वायु आणि आदित्य अपेक्षेने अग्नि तिसरा वायु आणि आदित्य अंशोशी आहेत जो अग्नि तोच प्राण तोच परमात्मा अशी ध्यान दृष्टी करावी. हा अग्निच अर्क होय या पुढील परिच्छेदात हाच अर्थ घ्यावा. या आदित्य शरीराचे वर्णन वरील मंत्रात केले आहे.

स अकामयत द्वितीयो मे आत्मा जायेत इति स मनसा वाचं मिथुनं समभवत्

अशनाया मृत्यु: तत् यत् रेत: आसीत् स संवत्सर: अभवत्। न ह पुरा तत्:

संवत्सर: आस तं एतावतं कालं अनिम:। यावान् संवत्सर: न एव एताव कालस्य

परस्तात् असृजत्। तं जातं अभिव्याद्दात् सभाग् अकरोत सा एव वाक् अभवत्।४

आपल्याला दुसरे शरीर प्राप्त व्हावे अशी त्या मृत्यूला इच्छा झाली. म्हणून त्याने मनाचा वाणीशी संग घडवून आणला. त्याच्यातून बीज निर्माण झाले तेच संवत्सर होय. या पावेतो संवत्सर नव्हते. संवत्सर निर्माण करणाऱ्या प्रजापतीला या कालावधी पर्यत अंड्याच्या रुपात धारण केले होते. संवत्सर काल सरल्यामुळे ते अंडे फुटले व त्यातून अग्नि निर्माण झाला. तो जन्मताच मृत्यूने त्याला खाण्याकरता आपला जबडा पसरला हे पाहताच ते नवजात अर्भक घाबरले आणि त्याने मोठ्याने चित्कार केला. हीच वाणी झाली.

वेदात असे वर्णन आले आहे त्याने मनात संकल्प केला. त्या संकल्पातून रेत निर्माण झाले. त्याचा गर्भ झाला. तो गर्भ अंड्याच्या रूपात राहिला काही काळानंतर ते अंडे फुटले या कालावधीला संवत्सर असे म्हणण्यात आले त्यातून अग्नि निर्माण झाला. (अनिम धारण केले अभिव्यादात् जबडा पसरला)

स ऐक्षत यदि वा इयं अभिमंस्ये कनीय: अन्नं करिष्ये

इति स तया वाचा तेन आत्मना इदं सर्व असृजत यदीयं

किंचर्च: यजूंषि सामानि छंदासि यज्ञान् प्रजा: पशून्।

स यत् एन असृजत तत् तत् अत्तुं आध्रियत सर्वं वा अत्ति

इति तत् अदिते: अदितित्वं सर्वस्य एतस्य अन्तं भवति

सर्वं अस्य अन्नं भवति एवं एतत् अदिते: अदितित्वं वेद।५

त्या मृत्यूने असा विचार केला की मी जर याला ठार मारले तर मला थोडेसे अन्न होईल असा विचार करून त्याने त्याला भक्षण न करता त्याचा मन आणि वाणीशी संयोग घडवून आणला व सर्व विश्व उत्पन्न केले. त्यातूनच ऋक् यजु साम इत्यादी वेद यज्ञ प्रजा पशु इत्यादि सृष्टी निर्माण झाली ती निर्माण झाल्यानंतर सर्वच खाण्याची मृत्यूला इच्छा झाली म्हणून त्याला खादाड अदिती असे नांव पडले. जो या प्रमाणे अदिती नामक मृत्यूचे अदितित्व जाणतो तो सर्वांचा भक्षक कर्ता होतो. मग सर्वच त्याचे अन्न होते.

बीजच जर खाऊन टाकले तर धान्य कसे निर्माण होणार म्हणून शेतकरी बीज न खाता उत्पन्नासाठी बीज वेगळे ठेवतो. इथे मृत्यूनेही तेच केले. छंद याचा अर्थ मंत्र ते निरनिराळ्या वृत्तात लिहिलेले आहेत. उदा. गायत्री उष्णिक अनुष्टुप बृहती पंक्ती त्रिष्टुप, जगती इत्यादि. ऋग्वेदात अदिती म्हणजे स्वर्ग अंतरिक्ष मातापिता इत्यादि वर्णन आढळते. (माता रुद्राणां दुहिता वसूनां या मंत्रात तिचा उल्लेख आहे)

स अकामयत भूयसा यज्ञेन भूय: यजेय इति स अश्राम्पत्
स तप: अतप्यत तस्य श्रान्तस्य तप्तस्य यश: बीर्य उपक्रामत्
प्राणो वै यश: वीर्यं तत् प्राणेषु उक्रान्तेषु शरीरं श्वयितुं अध्रियत तस्य शरीर एव मन आसीत्।६

आपण मोठा यज्ञ करावा अशी त्याला इच्छा झाली म्हणून त्याने यत्न पूर्वक तपाचरण केले. त्यामुळे तो दमला. अशाप्रकारे श्रान्त व तप्त झालेल्या त्याजपासून त्याचे अवयवभूत असलेले वीर्य व यश त्याला सोडून गेले. प्राण हेच त्याचे यश व वीर्य होते. याप्रमाणे प्राणच निघून गेल्यावर त्या प्रजापतीचे शरीर अमेध्य - यज्ञासाठी अनपयुक्त झाले. परंतु त्याही परिस्थितीत त्याचे मन त्याच्या शरीराशी संलग्नित होते. वरील गोष्टीचा संबंध पूर्वकालीन अश्वमेध यज्ञाशी आहे. त्यावेळी त्याच विचाराने भरलेला होता अश्वमेध यज्ञ व तिजपासून होणारी फल प्राप्ती हेच त्याच्या मनात घोळत होते. त्यामुळे त्यांनी पुढील विचार केला. (अध्रियत - चिकटून राहिलेला)

स अकामयत मेध्यं मे इदं स्यात् आत्मन्वि अनेन स्यां इति। ततोअश्वः समभवत् अवत् तन्मेध्यं अभूत् इति। तदेव अश्वमेधस्य
अश्वमेधत्वं। एष एव ह वा अश्वमेधं वेद य एवं एनं वेद। सं अनवरुद्धय
एव अमन्यत। तं सवंत्सरस्य परस्तात् आत्मनः आलभत। पशून् देवताम्यः
प्रत्यौहत्। तस्मात् सर्वदेवत्यं प्रोक्षितं प्राजापत्यं आलभन्त। एथ एव अश्वमेध ः
यःएव तपति तस्य संवत्सरः आत्मा अथं अग्निः अर्कः तस्य इमे लोकाः आत्मनः
तौ एतौ अर्कौ अश्वमेधौ स पुनर एकैव देवता भवति मृत्युः एव आपःपुनर् मुत्यूंजयति।
नैनं मृत्युः आप्नोति मृत्युः अस्य आत्मा भवति एतासां देवतानां एकःभवति। इति द्वितीयं ब्राह्मणं।७

हे माझे शरीर मेध्य, पवित्र, हवन करण्यास योग्य व्हावे व याने मी आत्मवान् व्हावे अशी त्याला इच्छा झाली म्हणून प्राणाने पुनः त्याच्या ठिकाणी प्रवेश केला. तेव्हा तो अश्व झाला. तो अश्वरुपी प्रजापती आता पवित्र झाला. म्हणून पवित्र झालेल्या अश्वाला अश्वमेध म्हणतात. जो या प्रमाणे अश्वाला अग्निरुप जाणतो तोच अश्वमेध जाणतो. पुनःयज्ञ करण्याच्या इच्छेने प्रजापतीने त्या पशूला मोकळा सोडला. एक संवत्सरानंतर त्याला त्याने स्वतः करता मारले. त्यावेळी त्याने सर्व पशूना त्या त्या देवतांच्याकडे पाठविले म्हणूनच यज्ञामध्ये देवाना अर्पित करण्यात घेणाऱ्या पशूना मारले जाते. हा जो आदित्य तपन पावतो तोच अश्वमेध होय. संवत्सर हाच त्याचा आत्मा अग्नि हा अर्क, हे तीन लोक त्याचे शरीरावयव होत. अग्नि, आदित्य हे अनुक्रमे अर्क व अश्वमेध होत. ही दोन्ही मिळून एकच मृत्युदेवता होय. जो या अश्वमेधरूपी मृत्यूला जाणतो तो मृत्यूला जिंकतो. त्याला मृत्यु येत नाही कारण मृत्यू हा त्याचा आत्मा हिरण्य गर्भ होतो. यासर्व देवतांचे सामूहिक फळ मृत्यूच होय. इथे दुसरा ब्राह्मण समाप्त.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

वाढत्या असुरक्षिततेची मुळे आत्मकेंद्रितपणात आहेत.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*आत्मसाक्षात्काराच्या अनुभूती संदर्भातील विवेचन असणारा हा लेख आहे. - संपादक*

## प्रास्ताविक


भारतीय संस्कृतीत तत्त्वज्ञानात्मक ज्ञानास 'अर्थबोधाची' आवश्यकता अत्यंत जाणीवपूर्वक सांभाळली गेली आहे. त्यामुळे पुराणे, उपनिषद, तंत्र, यंत्र, मंत्र, योग (हठयोग, राजयोग, भक्तियोग व इतर ज्ञात, अज्ञात योगसाधना जशी 'कुंडलिनी जागृती') ह्या व इतर धार्मिक रीतिरीवाज, मूर्तीपूजा वगैरे सुद्धा ह्या 'आत्मबोध व ब्रह्मज्ञान' ह्या 'चीजा' पूर्ण खरे बोध प्राप्त होण्यासाठीच रचल्या आहेत व संभाळल्या आहेत. हे खरे की, ज्ञान व योग नाते संबंधांची व ह्या सत्याची जाणीव सर्वसाधारण भारतीयांना नाही. ह्या 'साधना' युक्ती व यंत्रणा ह्या निरनिराळे संप्रदाय तरी देखील अत्यंत निष्ठेने संभाळताहेत.

'बहिर्गत' प्रवृत्तिपर समाजात 'भौतिकवाद व चंगळवाद किंवा राजकीय व सामाजिक परिवर्तनात गुंतलेल्या समाजाला ह्या गुंतागुंतीच्या प्रसारांचा, यंत्रणेचा परस्पर संबंध व अंतिम उद्दिष्टांचा परिचय वा जाणीव नसली, तरी युगायुगांत ह्या सर्व भिन्न भिन्न चौकटीत चालणाऱ्या चळवळींनां, त्यांचा नैसर्गिक, ईश्वर नियंत्रित 'आत्मोन्नती करणाऱ्या वैश्विक जीवनचक्रांचा एकत्रित व विचारांच्या श्रेणीचा अर्थ सांगणाऱ्या दैवी अवतारी पुरुषांचा पृथ्वीवरील वास्तव्याचा व नेतृत्वाचा गुरु उपदेश व मार्गदर्शनाचा लाभ युगायुगांतून मिळतोच!!

दुर्दैव हे आहे की ह्या अदृश्य नातेसंबंधांचा उद्योग व कार्य सामान्य जनाला किंवा त्यांच्या राजकीय व सामाजिक उद्धाराला बांधलेल्या मानवी भौतिकवादी नेतृत्वाला काहीही ध्यानीमनी येत नाही व त्यांचे भौतिक प्रयत्न खऱ्या बोधा अभावी विस्कळीत व अज्ञानी पद्धतीनेच चालू असतात व बऱ्याच अंशी "Cross purposes & leading to conflicts" म्हणजे परस्पर विरोधी, असहिष्णू व पुष्कळवेळां संघर्षात व परस्पर युद्धात ही विकृतपणे परिणीत होताना दिसतात.

**हे असे का होते?**

श्री ज्ञानेश्वरांचा ''पंथराज'' ह्या आपल्या Ph.D. च्या प्रबंधात -


भक्तिमार्गाधिष्टीत कुंडलिनीयोगावरील एक अभ्यास—

श्री ज्ञानेश्वरांचा

पंथराज :

कुंडलिनीयोग ( स्वरूप आणि विवेचन )

लेखक : डॉ. बा. त्र्यं. शालिग्राम
एम्. ए., पीएच्. डी.

प्रस्तावना : डॉ. रा. शं. वाळिंबे
एम्. ए. पीएच्. डी.
मराठी विभाग-प्रमुख : पुणे विद्यापीठ ( निवृत्त )

स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे ३०.

बाष्फळ बडबडीने विपर्यास होतात.



पंथराज चतुर्मुखी मुद्रा

डॉ. बा. त्र्यं. शाळिग्राम (M.A. Ph.D.) हे श्री ज्ञानेश्वरांची व्यथा व निरीक्षण वर्णन करून सांगतात, ते मला अत्यंत समर्पक वाटते. ''वेद, शास्त्र, पुराणांतरीचे जे गर्भितार्थ आणि संकेतार्थ, लोकांच्या अंतःकरणातून (सूक्ष्म शरीराचे अंग) लोप पावलेले असून केवळ 'बाह्य शब्दज्ञानांवर' वाढलेले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने सामान्य लोक 'आत्मसज्ञाक्षात्कारापासून अलिप्त राहिलेले आहेत. त्याचा परिणाम असा की सामान्य। ति सामान्यापासून तर वैदिक, ज्ञानी पंडितापर्यंत सर्व जीव, विषय भोगाच्या ठिकाणी पूर्णतः आकृष्ट झालेले आहेत. इतकेच नव्हे तर साधना, तपश्चर्या, भक्तियुक्त ध्यानधारणा देवदेवतांचे त्यांना इतके संकट वाटू लागले आहे की, तिकडे संपूर्णतः पाठ फिरवून लोक सरळ आणि सुलभ वाटणाऱ्या बाह्य कर्मातच रंगून गेलेले आहेत!! त्यामुळे ''आत्मदर्शनच्या परमसुखसोहळ्यापासून'' ते वंचित झालेले आहेत. थोडक्यात, सर्व लोकांना अक्षरशः 'स्वहित' कशाला म्हणतात याचाच विसर पडलेला आहे!!

**पारिभाषिक शब्दांचे अर्थ**

मी वर काही 'पारिभाषिक' शब्द वापरले गेलं आहेत. त्यांचे मला अभिप्रेत असलेले अर्थ विशद करणे आवश्यक वाटते आहे व ते देतो आहे!!

सध्याची पिढी ह्या ''आध्यात्मिक शास्त्राच्या ज्ञानापासून'' एवढी दूर गेली आहे की त्यांना शब्दार्थ प्राप्त झाला तरी इतर ''भावार्थ, ज्ञानार्थ, संप्रदायार्थ, गर्भितार्थ, रहस्यार्थ वगैरे अर्थ प्राप्त होणे दुरापास्त आहे, ह्याची जाणीव मला आहे! म्हणूनच त्यांतील कांही शब्दांचे अभिप्रेत सत्य अर्थ आपण पाहू या.

'अंतःकरण' ह्याला पातंजल योगदर्शनातील अर्थ म्हणजे प्रथमतः अंतःकरणाचे प्रत्यक्ष स्थान **'सूक्ष्म शरीरात'** आहे व त्याचे चार अवयव 'चित्त, बुद्धी, मन, अहंकार' हे आहेत.



ईशोपनिषद् : 59

बन्धन छूट सकता है। मृत्यु का बन्धन किस प्रकार छूट सकता है यही अन्तिम प्रश्न है, जो इन मन्त्रों के सम्बन्ध में उत्पन्न होता है। इस प्रश्न का उत्तर सुगमता से समझ में आ जावे इसलिए हम इन शरीरों का एक कल्पित चित्र नीचे देते हैं–

तीनों शरीरों का चित्र

स्थूल शरीर- अन्नमय कोष

सूक्ष्म शरीर-
१. प्राणमय
२. मनोमय
३. विज्ञानमय कोष

कारण शरीर = आनन्दमय कोष

स्वप्नावस्था के द्वारा/सूक्ष्म-कारण शरीरों का सम्बन्ध

| | |
|---|---|
| जाग्रत अवस्था के द्वारा सूक्ष्म = स्थूल शरीरों का सम्बन्ध | प्रमाण के द्वारा स्थूल-सूक्ष्म शरीरों का सम्बन्ध |

इन्हीं तीनों शरीरों का विभाग एक और प्रकार से किया गया है जिसे कोष कहते हैं उसका विवरण इस प्रकार है–

(१) स्थूल शरीर–अन्नमय कोश
(२) सूक्ष्म शरीर–१. प्राणमय, २. मनोमय, ३. विज्ञानमय कोश।
(३) कारण शरीर–आनन्दमय कोश

योग–३ शरीर–५ कोश

इन तीनों शरीरों के दो सम्बन्ध हैं–
(१) अवस्थाओं के द्वारा सम्बन्ध।
(२) प्राण के द्वारा सम्बन्ध।

हे सर्व सूक्ष्म ज्ञानतंतू कर्मतंतूच्या नाड्यांमार्फत **'स्थूल शरीराशी'** व त्यांतील शरीरातील भौतिक यंत्रणा **'ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय'** ह्यांच्याशी जोडलेले असतात. ''आत्मसाक्षात्कार'' जर झाला नाही तर मानवी जीवन

प्राणी जीवनापेक्षा निराळे ठरुं शकत नाही. दिशाच्या मागील अंकात मी आपल्या पृथ्वीवरील जीवनाला "Embodied Consciousness" म्हणजे 'शरीरबद्ध आत्मा' असे वर्णन दिले आहे. कारण, हा 'जीवात्मा' ही खरी ज्ञाताची भूमिका बजावत असतो. (Knowledge Receiver) नाशिवंत शरीर, हे त्याला पृथ्वीवरील ठराविक कालमर्यादित आयुष्यापुरते साधन-भोग व ज्ञान व कर्म व पुरुषार्थ साधण्याकरिता दिलेले असते. त्याचा पूर्ण उपयोग करणे हे शहाणपणाचे लक्षण आहे. त्यामुळे स्वतःला आत्मा (जीवात्मा) असे जाणून त्याचे दर्शन, ज्ञान होण्यासाठी व अपरोक्ष 'साक्षात्कार' करुन घेणे हे आवश्यक ठरते. ते जेव्हा प्रत्यक्ष होते. तेव्हां निदान भक्ति पंथी धीरी त्याला 'आत्मसाक्षात्काराचा परमसुख सोहळा' मानून अत्यानंदित होतात. ह्याचे मुख्य कारण 'आत्मा' स्वसंवेद्य आहे. इतर सर्व जो जाणतो. त्याला दूसरे 'जड' इंद्रिये कशी बरे जाणणार?

म्हणूनच आत्मा हाच ''द्रष्टव्य, श्रोतव्य, मन्तव्य, निदिध्यासितव्य-स्वतः आहे. हा आत्मा अगृह्य, गृहीत होत नाही. तोच स्वतःला जाणू शकतो, पाहू शकतो. म्हणूनच ज्या योग साधनेने हे होते तो 'आत्मसाक्षात्कार' आहे. आता 'स्वहित' कशाला म्हणावयाचे?

हे 'स्वहित' कोणते हे प्रत्येक व्यक्तीच्या स्वतःच्या नश्वर देहबद्ध अवस्थेतील ज्ञानाच्या जाणीवेतील श्रेणीवर अवलंबून असणार नाही कां? आपल्याला भौतिकवादी स्वहिताच्या व्याख्या व स्वप्नांची कल्पना आहेच, पण ज्यांना 'अध्यात्मशास्त्रांचे' महत्त्व माहीत झाले आहे, त्यांना त्यांच्या 'स्वहिताच्या' कल्पना व फल अपेक्षा, त्याच्या म्हणजे 'जीवात्म्याच्या 'वैश्विक सत्याशी' जोडलेल्या असणार हे स्वाभाविक आहे.

त्यामुळे एका गोष्टीकडे लक्ष वेधून घेतो व असे मी म्हणतो आहे की, अनेक गोष्टींचे अर्थ लावतांना सर्वसाधारण माणूस हा आपल्या जीवाच्या देहाच्या जाणीवेच्या जडात्मक स्थितीमध्ये अनेक जीवन, शरीर, प्रकृती मधील अनुभवांचे व जीवन व्यापारांचे अर्थ लावतो. ते स्वाभाविक आहे. पण, ज्यावेळी त्याला देहाच्या व मनाच्या व इंद्रियांच्या दृष्टीमध्ये अदृश्य अंतरंगातील व्यवहार व उलाढाली, ह्या सूक्ष्म यंत्रणांकडे बघण्याची दृष्टि प्राप्त होते. तेव्हाच व तेव्हाच फक्त -त्याला वरील चर्चेचा खरा सत्य बोध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स. कृ. देवधर आपल्या एका पुस्तकात जेव्हा 'शब्दार्थ, संकेतार्थ, संप्रदायार्थ, गुहयासार्थ, रहस्यार्थ, भावार्थ, ज्ञानार्थ वगैरे अर्थ लावण्याच्या अनेक ज्ञात पद्धतीमधील भेद वर्णन करुन सांगतात त्यावेळेसच आपल्याला सामान्यपणे अंगवळणी पडलेल्या केवळ 'शरीर-संलग्न', 'भौतिकवादी- संलग्न', सामान्य अर्थ लावण्याच्या संवयीची व ह्या पद्धतीतील एकांगी अर्थाची जाणीवच फक्त होऊ लागेल!!

### अनुभूतीवर आधारलेले सत्यार्थ

अनुभूतिशास्त्राच्या अभ्यासाला मात्र ह्या सर्वसाधारण अर्थ बोधाच्या पद्धतीच्या 'अपूर्णतेची व ब्रह्मज्ञानाच्या विविध स्तरावरील व अवस्थेतील अर्थप्राप्तीच्या अनंत प्रकारांची जाणीव आवश्यक होईल. हे अर्थबोध व प्रकार व भेद जाणून योग्य समर्पक अर्थपद्धती वा एकात्म म्हणजे पद्धतीची गरज आहे. हे अत्यंत आवश्यक बदल होणे जरुरीचे आहे. भौतिकवादी ज्ञानी व विव्हान्तंता बहुतांगी ही जाणीव नसते, म्हणूनच त्यांच्या ज्ञानपद्धतीतील "Paradigan Bound" सांप्रदायिक जडवादी विज्ञानाची ही मर्यादा Thomas Kunh ह्या शास्त्रज्ञाने उघड मांडली आहे.



- थॉमस कुन्ह

ह्यालाच अर्थ पद्धतीची चौकट म्हणतात व ती 'ब्रह्मज्ञान' मिळवावयाला अपूर्ण, तोकडी व अशक्त आहे. ह्या चौकटीतील, पैरॅडियममधील विश्वासू, बंदिस्त बुद्धिवादी, त्यांच्या ह्या मर्यादांबद्दल नुसतेच अज्ञानी व मुग्ध नसतात तर ते त्यांच्या 'मर्यादांचे' जड बुद्धीवादाने समर्थन करतात, त्यांच्या प्रिय 'Scientific Temper' च्या तत्त्वावर आधारून नव्हे तर सर्वसाधारण वकिली युक्तिवादाने. ही गोष्ट भारतीय अध्यात्मवाद्यांनी मुद्दाम लक्षात ठेवावयाला हवी व समाजाच्या दृष्टीत आणून द्यावयाला हवी. त्यामुळे आपण आतां सामान्य जड ज्ञानेद्रियांना ज्या गोष्टी वैश्विक सत्य (Cosmic Reality) असूनही ज्ञात होत नाहीत, वा जाणवत नाहीत त्या गोष्टींचा महत्त्वाचा विचार करतो आहोत. नकळत कां होईना, वरील चर्चेत आपण 'खुद्द जीवात्म्याचाच विचार केला. हा 'जीवात्मा' ह्या पृथ्वीवर त्याच्या शारिरीक जड-ज्ञानेंद्रियाच्याद्वारे म्हणजे - ''श्रोत्र, त्वक, चक्षु, जिव्हा, घ्राण - म्हणजेच साध्याभाषेत त्वचा, डोळे, जीभ, नाक वगैरे शरीरबद्ध, मर्त्य, नाशिवंत साधनांनी ह्या सृष्टीचे दर्शन घेतो व अनुभव प्राप्त करतो, पण गंमत म्हणजे तो स्वतःला प्रत्यक्ष वेगळेपणाने जाणत नाही. जीवात्म्याचे वर्तन पाहिले तर तो संबंध पृथ्वीवरील जीवनात 'स्वतःला स्वतंत्र शरीरच समजतो व ह्या शरीराच्या म्हणजे 'स्थूल शरीराच्या' मृत्यूला स्वतःचा मृत्यू समजतो. हे पूर्ण अज्ञान आहे व ह्या अज्ञानातून आपल्या भारतीय संस्कृतीतील वेद, उपनिषद वगैरे श्रृती ज्ञानाने प्रकाश टाकलेला असूनही त्याची ह्या संभ्रमातून सुटका वा मुक्तता होत नाही. ह्या अज्ञानातून सध्याचे भौतिक विज्ञान इंचभरही मदत करू शकत नाही; उलट आपल्या भौतिकवादी शोध, संशोधन व प्रगतीच्या खेळामध्ये त्याला मोहित करुन त्याच्या अज्ञानाचे जाळे आणखीनच गडद व गुंतागुंतीचे करते आहे. तेव्हा ह्या आत्म्याला तत्त्वज्ञानाने म्हणजे केवळ बुद्धीवादाने समाधान प्राप्त होणे हे अपुरे व अस्थिर लक्षण आहे. पण, भारतीय 'योगशास्त्रातील साधनेने' मात्र त्याला ही 'अपरोक्ष अनुभूती' मिळवून देऊन खऱ्या अर्थाने भारतीय अध्यात्मशास्त्राने अद्वितीय कामगिरी केली आहे.

सर्वांत कौतुकाची गोष्ट ही की ज्ञानेश्वरांच्या काळातील सर्वसामान्य समाजातील संतमंडळींना हा आत्मसाक्षात्कार व त्याचा सोहळा प्राप्त झाला. ही एक ज्वलंत व अत्यंत जवळच्या काळातील गोष्ट आहे. चोखामेळा, नामदेव, सावतामाळी, सेना न्हावी, गोरा कुंभार, संत तुकाराम, जनाबाई वगैरे अनेक व्यक्तींच्या प्रत्यक्ष नजीकच्या काळातील मानवी देहधारी उदाहरणे आहेत. आणखी पुरावा कशाला हवा आहे!!

पण, हे चमत्कार कोणत्या प्रकारे झाले व त्यांच्या कोणत्या साधना होत्या हा आपल्या लेखाचा विषय आहे. ह्या भारतीय वेदिक, योगिक संस्कृतीतील स्मृतीतून पूर्णपणे नष्ट झालेल्या 'अनुभूतिशास्त्राचा' व त्याला तात्विक भूमिका देणाऱ्या अनुभूतिवादाचा आपण विचार करतो आहे. मी हे शास्त्र पूर्णपणे नष्ट झाले हे अत्यंत जाणीवपूर्वक म्हणतो आहे, त्याचे कारण रामकृष्ण परमहंस, रमण महर्षी, विवेकानंद वगैरे अवतारी पुरुषांनी जरी ह्या 'आत्मदर्शनाची' सिद्धी मिळवलेली दिसली तरी त्या त्यांच्या 'अनुभूतिशास्त्राची' यंत्रणा व साधनेच्या गूढ पायऱ्या सामान्यजनांसाठी उलगडून ठेवल्या नाहीत. त्यांच्यापासून ज्या साधकांना ह्या विद्या प्राप्त झाल्या त्याचा 'प्रत्यक्ष उलगडा' दिसत नाही. तो एक चमत्कार व एक व्यक्तिगत अधिकार अशीच भावना व तसा इतिहास मागे उरला आहे. हे अर्थ बोध न झाल्याने अनुभूती न झाल्याने किंवा अनुभूती झाल्यावरही ती अनिर्वचनीय स्थितीत असल्याने ह्या सर्व प्रकाराला ''मिस्टिसिझम''(Mysticism) ह्या बंद कपाटात ढकलून बंद करण्यात येते आहे व होत आले आहे.

फक्त भारतात त्याचे संपूर्ण शास्त्र निर्माण होऊन ते संभाळले गेले आहे. भौतिकवादी राज्यकर्ते, शिक्षणकर्ते,

---

निर्गुणोपासना सर्वांत अवघड असते.

समाजनेते ह्या शास्त्राकडे ढुंकूनही पहात नाहीत अथवा त्याला अत्यंत **'आवश्यक ज्ञान'** असा सामाजिक दर्जा देण्याचा प्रयत्न करीत नाहीत. ही अत्यंत खेदाची व वैदिक संस्कृतीची हेळसांड म्हटली पाहिजे.

ह्या एक लेखात मी फक्त ह्या गंभीर विषयाची आठवण करून देतो आहे. ह्या शास्त्राची पूर्ण संशोधन करुन साधना करून व तशी अनुभूती प्राप्त करुन ती समाजात जिवंत स्वरूपात व ती समाज शिक्षण शास्त्रांत दाखल करण्याची आवश्यकता आहे. ही गरज काही एखादी कोपऱ्यांत करण्या योग्य धडपड अशी चीज नाही. कारण, ह्या भाग्यशाली भारत भूमीवर जी संस्कृती युगानुयुगे एका दैवी ज्ञानाचा प्रवाह होऊन वहात आहे, त्या मूळ प्रवाहापासून सध्याचा समाज अत्यंत दूर जाऊन भरकटला आहे. त्या समाजाला त्यांच्या मूळ आध्यात्मीक श्रेष्ठ व सत्य ज्ञानावर आणण्यासाठी ह्या व पूरक शास्त्रांच्या पुनर्स्थापनेची जरूर आहे व हे काम काही शतके करावे लागणार आहे.

तरच आणि तरच - 'भारताची संस्कृती' तिच्या मूळ स्त्रोतावर आरूढ होईल व सगळ्या मानवजातीला ह्या ज्ञानाचा प्रकाश देऊ शकेल. हा देखील एक दैवी भविष्यातील योग आहे हे निश्चित!!

पण ह्या शास्त्राची मांडणी व साधना ज्या शास्त्रावर आहे. त्यावरील 'महर्षि पातंजल व महर्षि व्यास ह्यांच्या भाष्यावर आधारलेली अशी मांडणी आपण दिशाच्या पुढील अंकात करूया.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०,
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## *तुम्ही बदला; जग बदलेल*

अनेकदा आपण ताण घेतो ते दुसऱ्यांच्या कृतींमुळे. ट्रॅफिकमध्ये असताना कोणी तरी वाहतुकीचे नियम पाळत नाही, म्हणून आपली चिडचिड होते. कधी कुणी तरी टाकलेल्या कचऱ्याचा आपल्याला खूप राग येतो. आपण या सगळ्या गोष्टीत काहीच करू शकणार नाही असे आपल्याला वाटते आणि आपण स्वतःलाच त्रास करून घेतो; पण एक लक्षात घ्या, जग तुमच्या-आमच्यासारख्या माणसांनीच बनलेले आहे. प्रत्येक जणच चुकत असतो; पण त्याला उत्तर स्वतःला त्रास करून घेणे नव्हे, तर स्वतः योग्य ती कृती करून दाखवणे आणि इतरांना त्यासाठी प्रोत्साहन देणे हे आहे. तुम्ही स्वतः वाहतुकीचे नियम पाळा, शिस्त पाळा, स्वच्छता राखा त्यामुळे लगेच सगळे तसेच करायला लागणार नाहीत; पण तुमच्या या कृतीचे सकारात्मक परिणाम नक्कीच दिसायला लागतील. एक जण योग्य दिशेने जात असेल, तर चुकीच्या दिशेने जाणाऱ्या मेंढरांपैकी काही तरी नक्कीच थांबतील. तुम्ही स्वतः योग्य कृती करून आदर्श घालून द्या.

●●●

उपासना करण्यासाठी मूर्ती हवी.

# श्री रामचरित मानस

*श्री रामचरित मानस या विषयासंबंधातील हा पुढील लेख - संपादक*

शिवजींना रामरायांना ह्या रूपात पाहून फारच आनंद झाला. अनिमिष नयनांनी ते रूप बघत राहिले पण ही वेळ चांगली नाही म्हणून त्यांनी आपला परिचय दाखवला नाही. जगत, पावन सच्चिदानंद की जय असं म्हणून कामदेवाचा नाश करणारे शिवजी तेथून निघाले. कृपानिधान श्री शंकरभगवान फार आनंदी अंत:करणाने श्री सतीजीं बरोबर जात होते. सतीजींना श्री शंकर भगवानजींची ही दशा पाहून फारच संदेह निर्माण झाला. त्या मनांत विचार करू लागल्या की श्री शंकर भगवानांना तर सगळं जग वंदन करतं; ते तर जगाचे ईश्वर आहेत मनुष्य देवता मुनिसुद्धा त्यांना प्रमाण करतात, त्यांच्या समोर नतमस्तक होतात. त्यांनी एका राजपुत्राला सच्चिदानंद परमधाम म्हणून प्रणाम केला. त्यांची शोभा बघून प्रेममग्न झाले आणि अजून सुद्धा त्यांचे प्रेम थांबत नाही. मग हा राजपुत्र कोण? जे सर्व व्यापक, मायारहित अजन्मा अगोचर इच्छारहित आणि भेदरहित आहे. आणि ज्याला वेद जाणतात, त्या शक्तींने तर मनुष्य अवतार धारण केला नाही?

शिवजींप्रमाणेच श्री विष्णुभगवान मनुष्यशरीर धारण करून अवतरले तर नसतील आणि जर ते ज्ञानाचे भांडार लक्ष्मीपती आणि असुरांचे शत्रू श्री विष्णू अज्ञानी मानवा सारखे स्त्रीचा शोध घेत कसे फिरतील. पण श्री शिवाजींचे वचन खोटे कसे असेल? सर्वच जाणतात की श्री शिवजी सर्वज्ञ आहेत. ह्या सर्व प्रकारामुळे श्री सतीजींच्या मनात फार मोठा संदेह निर्माण झाला आणि अज्ञानामुळे फारच मोह होऊ लागला. सतीजींनी ही मानसिक अवस्था श्री शंकरजींना सांगितली नाही तरी अतंर्यामी शिवाजींना हे सर्व कळलं. ते सतीजींना म्हणाले की तुमचा संदेह मनात ठेऊ नका. ज्यांची कथा अगस्त ऋषींनी वर्णन केली आणि ज्यांची भक्ती करण्याची पद्धत मी ऋषींना सांगितली तेच माझे इष्ट देव श्री रघुनाथजी आहे ज्यांची सेवा ज्ञानी लोक सुद्धा करतात. वेद नेति-नेति म्हणून किर्ती गातात, समस्त ब्रम्हांडाचे स्वामी मायापती नित्य परम स्वतंत्र्य ब्रह्मरूप भगवान श्रीरामजींनी आपल्या भक्तांच्या हिताकरीता आपल्या इच्छेने रघुकुलांत अवतार घेतला आहे.

श्री शंकरजींनी परत परत समजावून सुद्धा हा उपदेश सतीदेवींच्या मनाचे समाधान करण्यास असमर्थ ठरला. तेव्हा भगवंताच्या मायेचे बल जाणून शंकर भगवान सतीजीना म्हणाले की जर तुम्हांला माझ्या वचनावर विश्वास बसत नसेल तर तुम्हांला झालेला भ्रम नाहीसा होईल अशा तऱ्हेने विवेकाने वागा. शिवजींचे हे बोलणे ऐकून सतीजी तेथून कशा तऱ्हेने परीक्षा घ्यावी हा विचार करीत निघाल्या. इकडे शिवजींच्या मनांत असा विचार आला की मी सांगून सुद्धा सतीजींचा भ्रम तर्क विर्तक करण्यात अर्थ नाही. असा विचार करून ते रामरायाचा जप करू लागले. ह्या ठिकाणची चौपाई अशी आहे.

**''होइहि सोइ जो राम रचि राखा। को करि तर्क बढावै साखा॥**

ह्याचा अर्थ आपण पूर्वीच बघितला आहे. दुसरा अर्थ असा काढला जातो की,

**होइहै सोई राम रची राखा**

म्हणजे सतीच्या देहाची राख होणार हे त्यांना ठाऊकच

होते. पण ते रामरायांनीच रचून म्हणजे ठरवू न ठेवले होते म्हणून त्याबद्दल तर्क वितर्क करून फायदा नाही असे त्यांना वाटत होते. पुढील भागात सतीजींने योगाग्नित देहाचा त्याग केला हे आपण बघणारच आहात.

सतीजी प्रभू रामचंद्रजी जेथे होते तेथे आल्या. पुन्हा पुन्हा विचार करत ज्या मार्गावरून रामजी येत होते त्या मार्गावर श्री. सीतामातांचा वेष घेऊन उभ्या राहिल्या. प्रभू रामचंद्राची परीक्षा घेण्याकरीता त्यांना श्री. सीताजींचा वेष घेण्याची दूर्बुधी झाली.

सतीजींच्या बनावट वेष पाहून लक्ष्मण चकीत झाले. त्यांच्या मनांत सुद्धा फार मोठा भ्रम निर्माण झाला. खूप गंभीर झाले पण रामरायांच्या प्रभावाला जाणत होते म्हणून काही न बोलता उभे राहिले. सर्व जाणणारे व सर्वांच्या हृदयातील भेद जाणणारे श्री रामचंद्रजी सतीजींच्या कपटाला समजून चुकले. सतीजींना स्त्री स्वभावानुरूप प्रत्यक्ष परमेश्वरासमोर सुद्धा कपट करण्याची दुर्बुद्धी श्री सतीजींना झाली. आपल्या मायेने मोहित झालेल्या श्री. सतीजींना रामरायांनी प्रथम वंदन केले. त्यांना आपल्या पित्यासह आपल नाव सांगितलं आणि विचारलं की वृषकेतु श्री शिवजी कोठे आहेत आणि आपण एकट्याच या वनांत का फिरत आहात?

रामरायांचे हे कोमल रहस्यमय बोलणे ऐकून सतीजींना फार संकोच वाटला. त्या खूप घाबरल्या आणि चूपचाप शिवजींच्या जवळ जाण्यास निघाल्या. जाताना त्यांच्या मनांत विचार यायला लागले की मी शंकरजींचे सांगणे ऐकले नाही आणि आपल्या अज्ञानाने श्री. रामचंद्रजी वर आरोप केले. त्यांची परीक्षा घेतली. आता मी शिवजींना काय उत्तर देऊ. हा विचार येताच त्यांच्या मनात फारच दाह निर्माण झाला.

श्री. रामचंद्रजींना जाणीव झाली की सतीजींना फार दु:ख झाले आहे तेव्हा स्वत:चा प्रभाव दाखविण्याचा प्रयत्न केला. सतीजींना मार्गावरून श्री. रामचंद्र सीतामाता आणि लक्ष्मण हे तिघेही एकत्र जाताना दिसत होते. सर्व देव त्यांचे पूजन करत होते. थोडक्यात रामजींना सीतामातांचा विरह होणे हा सतीजींचा भ्रमच होतो. राम आणि सीताजी वेगळे झालेच नव्हते. तो सगळ्यांचा भ्रमच होता. हे सर्व आश्चर्यकारकच होते. भयकंपित अवस्थेत त्यांचे डोळे मिटूनच गेले. थोड्या वेळात त्यांनी डोळे उघडले तेव्हा थोड्या वेळा पूर्वीचे दृश्य नाहीसे झाले. त्यांनी रामरायांना मनातल्या मनात प्रणाम केला आणि श्री. शंकर भगवानकडे परत जाण्यास निघाल्या. श्री. शंकर भगवान जवळ आल्यानंतर श्री. शंकरजींनी प्रश्न विचारले की तुम्ही काय परीक्षा घेतली तेव्हा भीतीने त्यांनी खरी गोष्ट न सांगता सांगितले की तुम्ही सांगितलेली गोष्ट खोटी कशी होऊ शकते.

मी त्यांना फक्त प्रणाम केला. ह्यानंतर श्री. शंकरजींनी ध्यान करून झालेली गोष्ट बघितली. सतीजींनी सीतामाईंचा वेष घेतला हेही त्यांच्या ध्यानांत आले. त्यामुळे आता सतीजींशी प्रिती करणे योग्य नाही हे त्यांना वाटलं आणि मनांत त्यांनी निश्चय केला की आता मला सतीजींशी संबंध ठेवता येणार नाही. पण सतीजींच्या विरहाचं दु:ख आपल्याला सहन करावच लागणार आहे हे त्यांच्या मनांत आलं. ह्या द्विधामनस्थितीत ते कैलास पर्वतावर यायला निघाले. श्री शिवजींचा मानस बघून देववाणी झाली की हे शंभो तुमची रामभक्ती फारच उच्च दर्जाची आहे. अशा उच्चप्रतिच्या भक्तीशिवाय असा संकल्प कोण करु शकेल? ''तुमची धन्य हो'' ही देववाणी ऐकून सतीजींना फार आश्चर्य वाटले. त्यांनी शिवजींना विचारलं की आपण कोणता संकल्प केला आहे ते मला सांगा.

पण शिवजींनी त्यांना आपल्या संकल्पाविषयी काहीच सांगितले नाही. ते दोघेही कैलास पर्वतावर पोहचले. तेथे गेल्यावर आपला संकल्प मनांत ठेऊन श्री. शंकर भगवान समाधी लावून बसले. समाधी लावलेले श्री. शंकर भगवान बघून श्री सतीजींना सर्व कल्पना आली.

आकांक्षा, अपेक्षारहित असावं.

आपण केलेले कपट श्री शिवजींना कळले व म्हणूनच त्यांनी आपला त्याग केला आहे ह्यांची त्यांना जाणीव झाली. आपल्याला काहीच दोष न देतांना त्यांनी आपला त्याग केला ह्या गोष्टींनी त्यांना अपार दु:ख झालं. पण आपणच अपराध केला ह्याची त्यांना जाणीव झाली. पण पती दु:ख त्यांना सहन होईना. म्हणून त्यांनी मनांत रामरायांची प्रार्थना केली की मला शिवाजींचा विरह सहन होत नाही.

ह्या देहात माझे शिवजींचे मिलन होणे शक्यच नाही. तेव्हा ह्या देहातून माझी सुटका करा आणि मला दुसरा जन्म द्या ज्या जन्मात माझा परत श्री. शिवजींशी विवाह होऊ द्या.

इकडे बऱ्याच वर्षाने श्री शिवजींची समाधी पूर्ण झाली व ते रामनामाचा जप करत जागे झाले. श्री. शिवजी जागे झाल्याचे पाहून सतीजी त्यांच्या जवळ जाऊन बसल्या. त्याचवेळी सतीजींचे वडील दक्ष प्रजापती झाले. मोठेपणा मिळाल्यामुळे त्यांना फार गर्व चढला.

**नही कोऊ ऐसा जनमा जग माही। प्रभुता पाई जाही मद नाही।।**

त्यांनी ब्रम्हा, विष्णू आणि महेश ह्यांना न बोलवता मोठा यज्ञ सुरू केला. सगळ्या देवतांना बोलावणे गेले होते. त्यामुळे सर्व देवदेवता व त्यांचा परीवार सजून धजून विमानांतून दक्षांकडे जात होते. ते बघून शिवजींना ते काय आहे हे त्यांनी विचारले. शिवजींनी त्यांना दक्षांकडे होऊ घातलेल्या यज्ञ समारंभाबद्दल सांगितले. सतीजींनी शिवजींना आपल्या वडिलांकडे यज्ञासाठी जाण्याची परवानगी मागितली. त्यावेळी शिवजींना सांगितले की त्यांचे आणि दक्षाचे एकमेकांशी भांडण झालेले आहे आणि त्यामुळे प्रत्येकवेळी दक्ष त्यांच्या अपमानच करीत आले आहे. त्यामुळेच स्वत:च्या इतर मुलींना आणि जावयांना त्यांनी बोलावणे केले आहे. पण आमच्या विरोधामुळे तुम्हांलाही बोलावले नाही. गुरु, पिता, मित्र यांच्याकडे न बोलावता जाणं जरी योग्य असले तरी जेथे जाऊ नये . तेथे गेल्यास अपमानच होईल.

**जदपि मित्र प्रभु पितु गुरु गेहा। जाइअ बिनु बोलेहुँ न सँदेहा।।**
**तदपि बिरोध मान हहँ कोई। तहाँ गए कल्यानु न होइ।।**

शिवजींनी त्यांना तेथे जाण्यापासून परावृत करण्याचा खूप प्रयत्न केला. पण सतीजींची तेथे जाण्याची फारच इच्छा होती. तेव्हा नाईलाजाने आपले शिष्य गण बरोबर देत त्यांना दक्षांकडे पाठविले.

आपल्या वडीलांकडे म्हणजे दक्षांकडे येताच त्यांना फार नवलं वाटलं. त्यांच्याकडे बघून दक्षाला फार राग आला. तेथे यज्ञ होता. येथे श्री शिवजींचा भाग कोठेच नाही.

**तब चित चढेउ जो संकर कहेऊ। प्रभु अपमानु समुझि उर दहेऊ।।**

ते बघितल्या नंतर शिवजींचे जे सांगितले होते ते त्यांचे लक्षांत आले. त्यांना शिवजींचा असा अपमान सहन होईना. त्यांच्या आईने त्यांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण स्वजातीचा आणि स्वजनांचा अपमान त्यांना सहन झालाच नाही. यज्ञातील सर्व सभासदांना त्या रागाने बोलल्या की जेथे शिव आणि विष्णू ह्यांचा अपमान होतो तेथे शक्य असल्यास निंदा करणाऱ्या माणसाची जिभ ओढून प्राण घेऊन टाकावे अथवा कानावर हात ठेवून तेथून निघून जावे.

**संत संभु श्रीपति अपबादा। सुनिअ जहाँ तहँ असि मरजादा।।**
**काटिअ तासु जीभ जो बसाई। श्रवन मूदि न त चलिअ पराई।।**

शिव विष्णूंचा अपमानाच केला आहे आणि तेही माझ्या वडिलांनी. माझे जन्मदाते दक्षच आहे व म्हणून मी

---

आपल्या अपेक्षा असतात, त्यामुळे अपेक्षा भंग व दुःख होते.

चंद्रमौली शीपकेतूंचे स्मरण करीत माझ्या देहाचा त्याग करीत आहे असे म्हणून यज्ञात त्यांनी देह त्याग केला.

सतीजींच्या आत्मदहनाची वार्ता ऐकून शिवगणांनी यक्षाचा विध्वंस करण्यास सुरुवात केली. पाहून भृगुऋषींनी यज्ञाचे रक्षण केले. श्री शिवजींना हा समाचार कळताच त्यांनी क्रोधाने वीरभद्राला तेथे पाठवल. वीरभद्राने यज्ञाचा पूर्ण विध्वंस करून सर्व देवतांना यथायोग्य दंड केला. शिवद्रादी माणसाची जी गती होती तिच गत दक्षाची झाली. हा सर्व इतिहास सर्वांनाच ठाऊक आहे. त्यामुळे तो तुलसीदासांनी संक्षेपातच सांगितला आहे.

सतीजींनी मरतांना परमेश्वराला हा वर मागितला होता की मला जन्मजन्मांतरांत शिवचरणांवर प्रिती राहो म्हणून त्यांचा पुर्नजन्म हिमालयाच्या घरी पार्वतीच्या रूपांत झाला. सुख समृद्धी आली. नारद मुनींना हे वर्तमान कळाल्यानंतर ते कौतुकाने हिमालयाच्या घरी गेले. हिमालयाने त्यांच स्वागत केले. आपल्या पत्नीसह स्वत:च्या भाग्याची प्रसंशा केली आणि पार्वतीला ह्याच्या चरणांवर घातल आणि विचारणा केली की ह्या मुलीचे गुण दोष सांगा. नारदामुनींनी हसत सांगितलं की तुमची मुलगी गुणसंपन्न, सुशांत सुंदर समजुतदार आहे. ती सदा सौभाग्यवती राहील. पतीचं तिच्यावर फार प्रेम राहील. जगांत फार मोठी पतिव्रता होइल. इतके सगळे गुण असले तरी तिच्या नशिबात दोन चार अवगुण आहेत. येथे फार सुंदर दोहा आहे.

**''जोगी जटल अकाम मन नगन अमंगल वेष अस स्वामी एही कह मिलही परी हस्त असि रेख''**

योगी जटाधारी निष्काम हृदय, नंगा, अमंगल वेष असलेला असा नवरा मिळणार अशी हिची भाग्यरेषा सांगत आहे. नारद मुनींचे हे भविष्य ऐकून सर्वच दु:खी झाले. कारण नारद ऋषींची वाणी खोटी होऊच शकत नाही ह्यावर सगळ्यांचा विश्वास होता. हिमालयांनी ह्यावर काही उपाय सांगा अशी विनंती केली. पुन्हा सुंदर दोहा

**''कह मुनीस हिमवंत सुनु जो विधी लिखा लिलार देव दनुज नर नाग मुनि कोऊ न मेटनिहार''**
नारद मुनी हिमालयाला सांगतात की विधात्याने तुमच्या कपाळावर जे लिहले आहे ते देव, दानव, मानव, नाग अथवा मुनी सुद्धा मिटवू शकत नाही. पण यावर मी उपाय सांगू शकतो. जर दैवाने साथ दिली तरच तो उपाय सिद्ध होऊ शकतो. मी वराच जस वर्णन केल आहे तसाच वर पार्वतीला मिळणार ह्यात संशयच नाही. पण जे दोष मी वर्णन केले ते सर्व दोष शिवजींमध्ये आहेत. आणि जर शिवजींशी तिचा विवाह झाला तर हे सर्व अवगुण रुपांतरित होतील. अर्थांत ह्या सर्व अवगुणांना कोणी अवगुण म्हणणारच नाही. तेथील तीन चार चौपाई फारच सुंदर आहेत.

**जौ अहिं सेज सयन हरि करही। बुध कछु तिन्ह कर दोषु न धरही।।**

**भानु कृसानु सर्व रस खाहीं। तिन्हे कह मंद कगत कोउ नाही।।**

**सुभ अरु असुभ सलिल सब बहई। सुरसरि कोउ अपुनित न कहई।।**

**समरथ कहुॅ नहि दोषु गोसाई। रवि पावक सुरसरि की नाई।।**

विष्णु भगवान, सूर्य आणि अग्निदेव, गंगाजी ह्यांना कुठल्याच प्रकारचे दोषारोपण होत नाही कारण ते समर्थ आहे आणि समर्थाला कुठलाच दोष लावता येत नाही. तसं कारणाऱ्याला फार मोठ पाप लागतं. त्यामुळे शिवजींशी पार्वतीचे लग्न झाल्यास तिचं कल्याणच आहे. पण तप करून ते फार लवकर प्रसन्न होतात. जर तुझी मुलगी तप करेल तर शिवाजी ह्या पार्वतीच्या दोषांचा परिहार करू शकतात जगात वर तर बरेंच आहेत, पण हिच्याकरिता शिवाजींशिवाय दुसरा योग्य वरच नाही. शिवजी वर देणारे, शरणागतांची रक्षा करणारे कृपा सागर भक्तवत्सल आहेत.

पण त्यांची आराधना केल्याशिवाय मनवांछित फळ मिळतच नाही.

इतके सांगून आणि पार्वतीला आशीर्वाद दिला. हे पर्वतराज आपण चिंता सोडून द्या. आता सगळ कल्याणच होणार. अस सांगून नारदमुनी ब्रह्मलोकांत गेले. त्यानंतर पुढील घटना श्री तुलसीदासांना वर्णन केल्या आहेत. एकांतात हिमालयांची पत्नी त्यांना म्हणाली के हे नाथ मी नारदमुनींचे वचन समजले नाही. आपल्या कुलानुरुपाच वर मिळाला व उमाला शोभेल असाच वर मिळाल्यासच आपण तिचा विवाह करू, नाही तर मला उमा इतकी प्राण प्रिय आहे की मी तिला अविवाहितच ठेवेन. जर योग्य वराशी तिच लग्न लावलं नाही तर गिरी (पर्वत) जड बुद्धीचेच असतात. अशी आपली जगांत बदनामी होईल.

**जौ न मिलिहि वर गिरीजहि जोगू। गिरी जड सहज काहिही सब लागू।।**

पति चरणाची विनंती करुन लग्नानंतर आपल्याला दु:ख होणार नाही असंच करा अशी विनंती केली. त्यावर पर्वतराज हिमालयांनी उत्तर दिलं की हे प्रिये, ज्या परमेश्वरांनी पार्वतीला निर्माण केलं आहे ते तिचं कल्याणच करणार आहेत. त्यामुळे तू चिंता करण सोडून दे. आता जर तुझ्या मुलीवर प्रेम असेल तर तिला अशी शिकवण दे की शिवजींना मिळविण्याकरीता तिनं तप कराव. दुसऱ्या कुठल्याच उपायाने तिचे क्लेश मिटणार नाहीत. नारदजींनी दिलेला उपदेश एका विशिष्ट उदेशाने प्रेरित आहे. श्री शंकर भगवान सगळ्याच प्रकाराने अकलंकित आहेत त्यामुळे त्यांच्या बद्दल तू कुठलीच शंका घेऊ नकोस. पतीचे वचन ऐकून मैना खूप खुश झाली आणि आपल्या मुलीला श्री शंकरजींना प्रसन्न करण्यासाठी तप करण्यास सांगण्यास गेली. पण उमाचं लहान वय बघून तिचा कंठ भरून आला. तप तिच्याकडून कसं होईल ही काळजी तिला होऊ लागली.

त्यावर जगत माता भवानी आईला म्हणाली की माते मला एक स्वप्न पडलं. एक गौरवर्ण ब्राह्मणांनी मला सांगितलं की नारदमुनींनी जे तुला सांगितल त्याप्रमाणे तू तप कर. त्यामुळे श्री शंकरभगवान तुझ्यावर प्रसन्न होतील व तुझा स्वीकार करतील. हे वर्तमान मैनाने आपले पती पर्वतराज हिमालयांना सांगितल आणि मग सगळ्या परीवाराचा निरोप घेऊन उमा तप करण्याकरिता निघून गेली.

आपल्या मनांत श्री शंकराचे चरण धरून वनांत जाऊन उमाने तप केल. लहान वय असलं तरी सर्व भोगांचा त्याग करुन तप करायला सुरुवात केली. देहभान विसरुन श्री शंकरजींच्या चरणावर अपार प्रेम करू लागली. फळ खाऊन नंतर झाडाची साल खाऊन बरेच दिवस अन्न ग्रहन न करता तर काही वर्ष सुकलेली पाने खाऊन तर त्यानंतर त्यांचाही त्याग करुन तप केल. त्यामुळे त्यांना अपर्णा असही संबोधतात. अशी अनेक वर्षे तपस्या केल्यानंतर ब्रह्मवाणी झाली की हे गिरीराजकुमारी तुमचं मनोरथ आता पूर्ण होणार आहे. अनेक धीर आणि ज्ञानी मुनींनी सुद्धा इतकी घोर तपस्या केली नाही. त्यामुळे ह्या ब्रम्हवाणीवर विश्वास ठेवून तुम्ही हट्ट सोडा आणि तुम्ही आता हे क्लेश सोडून द्या. तुम्हाला आता श्री महादेव नक्की अंगीकारणार आहे. जेव्हा तुमचे पिता तुम्हांला बोलवायला येतील त्यावेळी त्यांच्या बरोबर घरी जा. तुम्हा सप्तऋषी जेव्हा भेटतील तेव्हा हे वचन खरं आहे ह्याचा तुम्हांला प्रत्यय येईल.

ब्रम्हवाणी ऐकून उमादेवीचं सर्व शरीर आनंदाने पुलकित झाले आणि त्यांना फार आनंद झाला.

**प्राचार्य सी. श्री. मुजुमदार**
१०४, फ्लॅट सी-२, इमारत क्र-३,
सी. एन.सी. रॉयल पार्क,
कांजुरमार्ग, मुंबई - ४०००४२.
भ्रमणध्वनी : ९७६९३१०७४६

●●●

# परिसर वार्ता

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

१) वि. प्र. मं. चे ठा. न. पा. विधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रीमती श्रीदेवी अय्यर हिने मुंबई विद्यापीठच्या एप्रिल २०१२ च्या तृतीय वर्ष विधी परिक्षेमध्ये विद्यापीठात दुसरा क्रमांक मिळविला. तिने ८०० पैकी ५४० गुण मिळवले.

२) विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी अ) विप्लवी सोनालकर, ब) अमृता बुरुडे यांनी नारी गुरुसहानी विधी महाविद्यालय उल्हासनगर यांनी आयोजित केलेल्या विधी मंथन स्पर्धेमध्ये भाग घेऊन दिनांक ०१.०९.२०१२ रोजी द्वितीय पारितोषिक मिळविले.

३) जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालयाने आयोजित केलेला दिनांक १५.९.२०१२ च्या हरिश मेरोरीयन वक्तृव स्पर्धेमध्ये विधी महाविद्यालयाचे कु. रंजनी कृष्णन आणि विकाष कुमार यांनी भाग घेतला.

४) डिवाइन इंडिया युथ असोसिएशन यांनी दिनांक ८.९.२०१२ रोजी आयोजित केलेल्या ''शिक्षा इवम विद्या'' या चर्चासत्रामध्ये विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी सहभाग नोंदविला, "Current future prospects of value based reformation of education system" हा चर्चासत्राचा विषय होता. सदर चर्चासत्राचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वेळुकर यांच्या हस्ते झाले.

५) विधी विभाग मुंबई विद्यापीठ व फोरम फॉर फेअर जस्टिस यांचा सौजन्याने दिनांक १३.९.२०१२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या न्यायीक सुधारणा या चर्चासत्रात विधि महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी भाग घेतला.

६) विधी महाविद्यालयामध्ये दिनांक १४.९.२०१२ रोजी हिंदी दिवस साजरा करण्यात आला. सदर दिवशी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परीक्षक म्हणून ॲड. स्वाती सिन्हा व ॲड. अंबर जोशी यांनी काम पाहीले. 'दया मरण', मुंबई लोकल ट्रेन, आय लव्ह इंडीया, या सारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त भाषण केले. खालील विद्यार्थी हे स्पर्धेचे विजेते ठरले. १. विकाष कुमार (प्रथम विधी) २. कु. प्रिती (प्रथम विधी) ३. रोहीत शर्मा (प्रथम विधी)

७) विधी महाविद्यालयामध्ये दिनांक १४.९.२०१२ रोजी इंग्रजी निबंध स्पर्धेचे आयोजन प्रथम विधीच्या विद्यार्थ्यासाठी करण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी 'फाशीची शिक्षा' 'इच्छा तेथे मार्ग' भारतातील गरीबी इ. विषय ठेवण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये खालील विद्यार्थी विजेते ठरले. १. रंजन कृष्णन (प्रथम) २. श्रुती एस. (द्वितीय) ३. कुमर वेंकटेश (तृतीय)

८) विधी महाविद्यालयामध्ये All India Report च्या मार्केटींग टिम ने दिनांक २१.९.२०१२ त्यांचा Report आणि नवीन योजना याविषयी विद्यार्थीना मार्गदर्शन केले.

९) यु. जी. सी. च्या माध्यमातून दिनांक ३०.९.२०१२ व १.१०.२०१२ रोजी अकोला येथे दोन दिवसाचे शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. "Consumer Protection & Welfare in Global Economy sector - 2012 हा शिबीराचा विषय होता. सदर शिबीराचे VPM'S TMC विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी "Consumer Protection

Model & Consumer Protection Act, 1986 " या विषयांवर त्यांचा प्रबंध सादर केला. सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी Adjudicatory Bodies and Redressal Authorities या सत्राचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. शिबीराचे उद्‌घाटन माननीय न्यायाधीश श्री. अशोक बॉन, अध्यक्ष राष्ट्रीय उपभोक्ता कमिशन यांच्या हस्ते झाले.

१०) जपानी प्रतिनिधींची भेट : १३ जपानी विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रा. डॉ. मिर्च यानो Kyoto Sangyo University, Japan याच्या सह विधी महाविद्यालयास दिनांक ६ सप्टेंबर २०१२ रोजी भेट दिली. प्राध्यापक विनोद वाघ व दोन विद्यार्थीनी सदर प्रतिनिधींना मंडळाच्या VN BRIM'S मधून सन्मानपूर्वक महाविद्यालयांत आणले. पुष्पगुच्छाने सर्वांचे स्वागत केल्यानंतर चहापानाचा कार्यक्रम झाला. प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी पॉवर पॉईंट च्या माध्यमातून भारतीय न्याय व्यवस्था आणि शिक्षण या विषयावर थोडक्यात विवेचन केले. विद्यार्थ्यांनी भजन व शास्त्रीय गायन गाऊन मंडळीचे मनोरंजन केले. विद्यार्थ्यांनी काढलेल्या रंगोळीचे विशेष कौतुक करण्यात आले. प्रा. यानो व सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून भेट देण्यात आली. हा नवीन अनुभव सर्वांना फार आवडला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

### अतिथी व्याख्यानमाला - ऑगस्ट २०१२

विषय : Perspective Management.

डॉक्टर अनिल नाईक यांनी व्यवस्थापन या विषयीचे विविध दृष्टिकोन विषद करताना आपल्या व्याख्यानाची सुरुवात नवीन उद्योजकांसमोरील आव्हाने आणि टप्पे या संबंधी आपले विचार व्यक्त करून केली. त्यांच्या मते व्यवस्थापन म्हणजे संस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी त्या संस्थेतील व्यक्तींनी एकत्रितपणे प्रभावीपणे कार्यक्षमतेने पार पाडण्याची सांघिक कृती आहे. व्यवसाय व्यवस्थापन या क्षेत्रांतील ध्येय, दृष्टिकोन, उद्दिष्ट, स्पर्धा, निर्णयक्षमता, नेतृत्व गुण या महत्त्वाच्या मुद्याबरोबरच व्यवसायामध्ये उद्योजकाने नेहमी आपले वेगळेपण जपले पाहिजे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे असे त्यांनी सांगितले. व्यवसायामध्ये सातत्याने नवनवीन गोष्टी शिकल्या पाहिजेत आणि काळानुरुप आपल्या कक्षा नव्याने आखल्या पाहिजेत. यावर डॉक्टर नाईक यांनी भर दिला.

भारतीय उद्योगव्यवस्थेची सद्यस्थिती, ग्राहकाचे समाधान, उत्पादन/सेवांचा उच्च दर्जा, ग्राहकाच्या गरजेनुसार तयार केली जाणारी उत्पादने इत्यादी विषयावरही डॉक्टर नाईक यांनी चर्चा केली. तसेच वैचारिक कौशल्य सृजनशील व्यक्तिमत्त्व या संकल्पना बद्दलही थोडक्यात माहिती दिली. या बरोबरच कौटिल्याने सांगितलेली व्यवास्थापानाची सूत्रे, जे. आर. डी. टाटा यांचे परिपूर्ण यशस्वी उद्योजकाचे व्यक्तिमत्त्व इत्यादी अनेक व्यक्ती आणि संकल्पना बद्दल डॉक्टर नाईक यांनी अनेक उदाहरणे आणि प्रसंग सांगून प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

विषय : Brand Management - Emerging International trends "Strategic Branding"

डॉ. अविनंदन मुखर्जी यांनी आपल्या व्याख्यानाच्या सुरुवातीला Branding ही संकल्पना श्रोत्यांना अनेक प्रश्न विचारुन Interactive Session पद्धतीने समजावून सांगितली. Branding मध्ये Brand चे घोषवाक्य कसे महत्त्वाचे असते. एखादा Brand हा स्वतःचे वेगळेपण कसे व्यक्त करतो. Social Media Marketing (FaceBook, twitter) Brand इत्यादी, तसेच प्रसिद्ध होण्यासाठी कसे मदत करु शकतात याबद्दल डॉ. अविनंदन मुखर्जी यांनी माहिती दिली. तसेच भारतीय बाजारपेठेची वैशिष्ट्ये वेगळे पण, Brand performance, Brand strategy, External Branding, Internal branding, interactive branding इत्यादी अनेक संकल्पना त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून

सांगितल्या. विविध brand बद्दल अनेक उदाहरणे आणि माहिती देऊन प्रश्नोत्तर पद्धतीने त्यांनी branding विषयाशी संबंधित अनेक मुद्द्यांवर चर्चा केली.

- **राष्ट्रीय विपणन संमेलन २०१२ (NATIONAL MARKETING SUMMIT 2012) "Emerging Trends and Prospects - Changing Play fields"**

''बाजाराच्या बदलत्या खेळ पट्टीवरील उदयोन्मुख कल / प्रवाह आणि संभाव्य उत्कर्ष'' या विषय सूत्रावर आधारित संमेलनाला या वर्षीही विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यामध्ये श्री. अहमद आफताब नाकवी (संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक Zozolo.com) यांनी आपल्या बीजभाषणात Bootstrapped Marketing या विषयावर सविस्तर माहिती देताना, एखाद्या नव्या उद्योजकाला कोणतेही कर्ज न काढता एखादा उद्योग कसा स्थापन करता येऊ शकतो, तसेच इंटरनेट वर या उद्योगाची ऑनलाईन प्रसिद्धी कशाप्रकारे करु शकतो, हे त्यांनी उपस्थितांना मुद्देसूदपणे समजावून सांगितले. तसेच online Brand reputation management या क्षेत्रातील आपले अनेक अनुभव तसेच या क्षेत्रातील अनेक आव्हाने त्यांनी आपल्या बीजभाषणात कथन केली.

संमेलनातील दुसरे वक्ते श्री. प्रभात सिन्हा (संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक, SMG Group) यांनी ''जाहिरात जगतातील उदयोन्मुख कल / प्रवाह'' या विषयावर आपली मते व्यक्त करताना जाहिरात क्षेत्राच्या उत्क्रांतीतील सुरुवातीपासून ते वर्तमान काळापर्यंतचे विविध टप्पे उपस्थितांसमोर मांडले.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. अनिल नाईक (संस्थापक Sudit Consultancy Services) यांनी "New-Age marketing Strategies-Re-inventing the future" या विषयावर बोलताना व्यूहरचना Strategy ही व्यवसायात टिकाव धरुन राहण्यासाठी कशा प्रकारे महत्त्वाची असते याबद्दल आपले विचार व्यक्त केले.

श्री. राजू म्हात्रे (Stragegic Business Head-Panacea Biotech Ltd.) यांनी "Leveraging Customer relationship" या विषयावर आपली मते मांडली व ग्राहक हित संबंधाचे महत्त्व सध्याच्या युगात किती महत्त्वाचे आहे ते स्पष्ट केले.

त्यानंतर (Current trends and issues in the Social media marketing) या विषयावर आधारित एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये श्री. राजू म्हात्रे, श्री. दिपक (Social Media Manager gozoop.com), श्री. मयूर, श्री. जयेश वैद्य (Sales Manager, Mumbai Region, CMA-CGM India Ltd.) आणि श्री. रोहन (Social Media Strategist Hungama Services) हे मान्यवर सहभागी झाले व त्यामध्ये Twiter, Face Book इत्यादी Social Media Marketing पद्धतीचा व्यवसायसाठीचा वापर व फायदे या विषयावर चर्चा करण्यात आली.

संमेलनाच्या शेवटच्या सत्रात विपणन विभागाच्या विद्यार्थ्यांनी "Green Marketing" या विषयावर चित्र फितीचे सादरीकरण केले. तसेच एका छोट्या प्रश्न मंजुषेच्या कार्यक्रमाचेही आयोजन केले गेले. सर्व विद्यार्थ्यांनी त्यात उत्साहाने सहभाग घेतला आणि त्यानंतर सादर झालेल्या आभार प्रदर्शनानंतर संमेलनाची सांगता करण्यात आली.

**राष्ट्रीय मानव संसाधन विकास संमेलन २०१२ (National HR Summit 2012)**

मानव संसाधन क्षेत्रातील नावीन्यपूर्ण कार्यपद्धती (Innovative Practices in HR) या विषयावर आधारित या संमेलनाची सुरुवात डॉ. के. सूर्यानारायनन, (संचालक डॉ. व्ही. एन. ब्रीम्स), डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सरसंचालक

डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) आणि डॉक्टर पी. एम. केळकर (अधिष्ठाता डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांच्या स्वागत पर भाषणाने झाली. या संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. किशोर भालेराव (Sr. V. P. - HR (Retd.) Persisitent Systems) उपस्थित होते. मानव संसाधन क्षेत्रातील नावीन्यपूर्ण कार्यपद्धती या विषयावर केलेल्या बीजभाषणात ते म्हणाले की, ''नावीन्यता ही तुमच्या उत्पादनाचे / उद्योगाचे मूल्य वाढवत असते. आजच्या आर्थिक परिस्थितीत तरुन राहण्यासाठी नावीन्यता हा एक खूप चांगला मार्ग आहे.'' आपल्याकडे नफा या शब्दाला चुकीच्या दृष्टीकोनातून पाहिले जाते. नफा हा काही वाईट शब्द नाही. सर्वच लोक पैसे मिळवण्यासाठीच व्यवसाय करत असतात. तुम्हाला कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त चांगला दर्जा राखून नफा मिळवला पाहिजे. कर्मचारी वर्गाला तुम्ही दर्जेदार सेवा पुरविणे हे अप्रत्यक्षपणे त्यांच्या कार्याकुशलतेमध्ये वाढ करण्यास / कार्यक्षेत्रात संतुलन राखण्यास मदत करणारे असते आणि म्हणूनच मानव संसाधन क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी नावीन्यपूर्ण पद्धती वापरून नवीन पिढीची मानसिकता ओळखून नवीन आव्हानांना सामोरे जाणे आवश्यक आहे.

त्यानंतर सौ. शारदा सुब्रमनिअन Innovative Practices - Learning and Development यांनी या विषयावर आपले विचार मांडले त्या म्हणाल्या की, वैयक्तिक पातळीवर शिकणे, संघ पातळीवर शिकणे आणि संस्था पातळीवर शिकणे या तीनही पातळ्या एकत्रितपणे संस्थेच्या कार्यसंस्कृतीत खूप महत्वाचे बदल घडवून आणू शकतात. संस्थेतील बदलांना सामोरे जाण्याबद्दलची कर्मचारी वर्गातील भीती दूर करण्यासाठी नावीन्यपूर्ण पद्धतीचा वापर उपयोगी ठरतो असे त्यांनी सांगितले. L & T Infotech येथे याच विभागाच्या प्रमुख असल्याने त्यांनी अवलंबिलेल्या अनेक नवीन पद्धतीबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

श्री. मेहेर्झाद दस्तूर यांनी (Innovative Practices - Employer Branding) या विषयावर बोलताना सांगितले की, एखाद्या व्यवसायाच्या व्यावसायिकाचा किंवा त्या व्यवसाय संस्थेच्या नावाचा (Brand) दर्जा कायम राखणे म्हणजेच त्या Employer Brand चे व्यवस्थापन करणे हे अत्यंत महत्वाचे आहे. कारण हा दर्जा / हे नाव (Brand) हे मौखिक प्रचारावर आधारित असते. ते अचानकपणे तयार होत नाही. व्यवस्थापकीय अधिकारी / कर्मचारी आपल्या जीवनातील ८७% वेळ कार्यालयात / संस्थेसाठी व्यतित करतात आणि त्यामुळेच त्या संस्थेची / कार्यालयाची कार्य संस्कृती किंवा त्यासंस्थेतील एकंदर वातावरण चांगले असणे हे त्या कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी, कर्मचाऱ्यांशी सहयोग, स्पष्ट आणि सातत्य पूर्ण संवाद, व्यवस्थापनाकडून कृतिशील आणि दृश्य सहकार्य आणि कठोर मापदंड हे काही महत्त्वाचे मुद्दे आहेत असेही त्यांनी सांगितले.

सौ. सुवर्णा जोशी यांनी Innovative Practices - Employee Engagement या विषयावर आपली मते मांडली. कोणत्याही संस्थेच्या मानव संसाधन विभागाने नेहमीच चपळ, जबाबदार आणि सुलभ उपलब्ध असणे आवश्यक आहे जेणेकरून त्या संस्थेतील इतर कर्मचाऱ्यांशी सुसंवाद साधून त्या कर्मचाऱ्यांना संस्थेमध्ये सौहार्द पूर्ण वातावरण तयार करण्यात सहभागी होण्यासाठी राजी करता येईल. अशा वातावरणात कर्मचाऱ्यांना आपली मते मोकळेपणाने मांडता येतात व संस्थेच्या निर्णय प्रक्रियेत या मताचा उपयोग होऊ शकतो. अशाप्रकारे कर्मचाऱ्यांच्या योग्य मतांचा सहभाग व्यवस्थापनातील त्रुटी दूर करणारा आणि विकासासाठी मदतीचा ठरतो. Siemens या संस्थेमध्ये यासंदर्भात वापरल्या जाणाऱ्या काही महत्त्वाच्या पद्धतींबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती करुन दिली.

त्यानंतर संमेलनाच्या विषयाला अनुसरुन एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये डॉ. आर.

के. बाल्यान, डॉ. एस. रविशंकर, श्री. मिलिंद ठाकूर, श्री. सौरभ दळवी, कु. रुबी फेर्नान्देस हे तज्ज्ञ उपस्थित होते. त्यांनी मानव संसाधन क्षेत्रात नावीन्यतेचे महत्त्व, GREEN HR, योग्य कर्मचाऱ्याची निवड, Work from Home संकल्पना, ''ग्राहक'' राजा तसा ''कर्मचारी'' राजा चे लक्ष्य आणि उद्योग संस्थेचे लक्ष्य याची मानव संसाधन अधिकार्याला घालावी लागणारी सांगड इत्यादी विषयावर चर्चा करण्यात आली. प्रश्नोत्तराच्या सत्रानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### प्रा. सौ. उषा राघवन यांना पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. प्रदान

प्रा. सौ. उषा राघवन ह्या वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनमध्ये माहितीतंत्रज्ञान या शाखेच्या विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी 'Evaluation of opto electronic properties of semi conductor nano materials' या विषयावर संशोधन केले असून त्यांनी आपला प्रबंध पुणे विद्यापीठाला सादर केला व विद्यापीठाकडून त्यांना पीएचडी ही सन्मानीय पदवी बहाल करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून डॉ. मुरळी सास्त्री व सह मार्गदर्शक म्हणून डॉ. बालाप्रसाद जी. अनकामवर यांनी काम पाहिले.

पुणे विद्यापीठाकडून पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल प्रा. सौ. उषा राघवन यांचे वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाकडून अभिनंदन करण्यात आले.

### तंत्रशिक्षण आणि व्यक्तिमत्त्व या विषयावर चर्चासत्राचे आयोजन

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनच्या इंडस्ट्रियल इलेक्ट्रानिक्स विभागातर्फे 'तंत्रशिक्षण आणि व्यक्तिमत्त्व' या विषयावर मार्गदर्शन करणाऱ्या एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ श्री. अच्युत गोडबोले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इलेक्ट्रॉनिक्स विषयापासून पुढे माहिती तंत्रज्ञानाचा प्रवास, प्रगती येणाऱ्या भविष्यातील संकल्पना साकार करतानाच व्यक्तिमत्त्व घडविण्याची नितांत गरज त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. तंत्रज्ञानाचा परिपूर्ण अभ्यास कोणतेही काम मनापासून करण्याची इच्छाशक्ती आणि सर्वांनी मिळून काम करण्याचं कौशल्य याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

या चर्चासत्रामध्ये गणिताशी दोस्ती, नॅनोटेक्नॉलॉजी, उद्योजकता या विषयावर उद्योजक श्री. विश्वास सोमण, उद्योजक किरण देशमुख व डॉ. माधवी ठाकूर देसाई यांनी मार्गदर्शन केले. या चर्चासत्राची सांगता ''सनदी परिक्षांमध्ये इंजिनिअर विद्यार्थांचा सहभाग'' या विषयावरील आयपीएस अधिकारी श्री. आशुतोष डुंबरे यांच्या भाषणाने झाली. या चर्चासत्राची आखणी प्राचार्य दि. कृ. नायक आणि विभाग प्रमुख प्रा. किर्ती आगाशे याच्या मार्गदर्शनाने झाली.

सदर चर्चासत्र दि. ८ सप्टेंबर रोजी लॉ कॉलेज बिल्डींग मधील मनु हॉल येथे पार पडली.

- वृत्त संकलन

**श्री. चंद्रकांत शिंगाडे**

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन,

ठाणे.

●●●



# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयीः**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

(पृष्ठ ..... २ वरून - **संपादकीय)**

आत्मकेंद्रित समाज आणखीन आत्मकेंद्रित होत होता; आणि आर्थिक श्रेष्ठत्व हाच यशाचा मापदंड ठरत होता. यामुळे तेथील लग्नसंख्या व कुटुंबसंस्था यांची मोडतोड सुरू होऊन आज त्या संपूर्णता विलयास गेल्या आहेत. संवेदना बधिर झालेल्या अशा समाजामध्ये सर्वच जबाबदाऱ्या व अधिकारांचा संकोच होत असतो. येनकेन मार्गांनी स्पर्धेत यश मिळवणे हेच जीवनाचे अंतिम ध्येय होऊन बसले आणि यातूनच मानवी अधिकारांपासून कुत्र्यामांजरांच्या अधिकारापर्यंतचा कल्पनाविलास मूळ धरू लागतो. साहजिकच यामध्ये सर्व सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रे शिक्षणासकट समाविष्ट होतात. शाळांकडेसुद्धा उद्योगधंद्याच्या स्वरूपात म्हणूनच बघायला सुरुवात झाली. उद्योगधंद्यामध्ये मालक, कामगार व त्याचा फायदा मिळवणारा जसा उपभोक्ता असतो, त्याच दृष्टिकोनातून शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक व विद्यार्थी यांचा विचार होऊ लागला. त्यापुढील पायरी म्हणजे उद्योगधंद्यांप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रामध्येही कायद्यांचे साम्राज्य सुरू झाले. या सर्वांचाच परिपाक व अतिरेक या देशांमधून इतका झाला की शिक्षकांनी वटारून बघणे हा सुद्धा विद्यार्थ्यांच्या अधिकाराचा भंग किंवा शिक्षकांनी केलेला जुलूम यांची चर्चा चालू झाली. याचाच एकत्रित परिणाम हा पाश्चात्त्य तरुण पिढीवर झाला व ही पिढी सामाजिक बेजबाबदार व व्यसनाधीन होण्यात झाली. पाश्चात्त्य देशांत या सगळ्यांचाच आता पुन्हा गांभीर्याने विचार होऊ लागला असून इंग्लंडमधील खालच्या कोर्टाने, प्रसंगी मुलाला शिक्षकाने चापट मारणे हा शिक्षकी जुलूमाचा प्रकार नसून संस्कारक्षम वयामध्ये अशा गोष्टींचा वापर समर्थनीय होऊ शकेल, असा क्रांतिकारक निर्णय दिला.

शिक्षण मिळवणे व वितरित करणे यांत शिक्षकांइतकाच पालक आणि कुटुंबाचा सहभाग असतो. खरे बोलण्याचे शिक्षण शपथेतून येत नसून आईवडील, नातेवाईक व शिक्षक यांनी प्रत्यक्ष जीवनात दाखवलेल्या कृतींतून होत असते. ज्या विद्यार्थ्यांच्या घरी आईवडील दारू पितात किंवा सिगारेट ओढतात ती मुले आयुष्यात लवकर अशा व्यसनांना बळी पडतात हे आता निर्विवाद सिद्ध झाले आहे. दुर्दैवाने सर्व सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करताना शिक्षणात ते आपण केले नाही तर नवलच ठरेल! म्हणूनच ५०-६० वर्षांपूर्वी तिकडे केलेले कायदे आज क्रांतिकारक बदल म्हणून आपल्याकडे होऊ लागले आहेत. आमच्या ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका यातील सदस्यांच्या शैक्षणिक पात्रतेबद्दल आपल्याला ठाऊक आहेच. त्यांची चारित्र्येही आपल्याला अधिक ठाऊक आहेत. रस्ते अडवून सण साजरे करणारे व ध्वनिप्रदूषणापासून सर्व कायदेभंगांमध्ये पुरुषार्थ मानणारे हे नेतृत्व शिक्षकाला व शिक्षणाला यापेक्षा काय वेगळे योगदान देणार? फाटके धोतर किंवा कोट घालून व्रत म्हणून स्वीकारलेल्या शिक्षकांची आपण नाटक सिनेमांतून टिंगल केली व त्यातून आजचा शिक्षक आपण निर्माण केला आहे. शैक्षणिक पेशा किंवा आवडीपेक्षा त्याच्या जातीवर शिक्षकाची भरती होत आहे. २४ तास चालणाऱ्या दृश्य माध्यमांतून दाखवल्या जाणाऱ्या मालिका, विनोदाच्या नावाखाली प्रदर्शित होत असलेले अचकट विचकट, हिडिस आणि बीभत्स कार्यक्रम, सर्व नृत्यप्रकारांना लावणीत परावर्तित करणारे संगीतातले सादरीकरण यावर चर्चा करणे तर सोडाच, पण मत मांडणेही मागासलेपणाचे लक्षण ठरू लागले आहे. याला जबाबदार कोण याचे खरे उत्तर म्हणजे, ''मी'' आहे. पण ही सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती आणणाऱ्या ''मी'' ला आपण कुठल्या तुरुंगात डांबणार आहेत?

**डॉ. विजय बेडेकर**
संपादक, दिशा

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.